अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. २४ सप्टेंबर २०२२ ▸ वर्ष : २० वे ▸ अंक : ३५५ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## रोहितची दमदार खेळी, भारताचा ६ विकेटस्‌ने विजय



✔ सुराज्य/नागपूर

**मालिकेत १-१ ची बरोबरी**

भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया दुसऱ्या टी२० सामन्यात भारतीय संघाने ६ विकेट्सने विजय मिळवत मालिकेत बरोबरी साधली आहे. सामन्यात भारतीय कर्णधार रोहित शर्माने नाबाद ४६ धावांची दमदार खेळी करत विजयाच मोलाचा वाटा उचलला. तसच दिनेश कार्तिक याने दोन चेंडूत १० धावा करत भारताचा विजय पक्का केला. पावसामुळे ८ षटकांच्या झालेल्या सामन्यातप्रथम फलंदाजी करत ऑस्ट्रेलियाने भारतासमोर ९१ धावांचे लक्ष्य ठेवले होते. जे भारताने ४ गडी गमावत ७.२ षटकात पूर्ण करत सामना ६ विकेट्सने जिंकला आहे. आजचा हा सामना सायंकाळी सात वाजता सुरु होणार होता. परंतू पावसाच्या व्यत्ययामुळे सामना उशीराने म्हणजेच ९.३० वाजता सुरु झाला. ज्यामुळे दोन्ही संघाना प्रत्येकी ८ ओव्हर्स खेळण्याची संधी देण्यात आली होती.

# अरे आव्वाज कुणाचा? ढाण्या वाघाचा, दसऱ्याला डरकाळी घुमणार




✔ सुराज्य/सोलापूर

माझ्या तमाम हिंदू बांधवांनो...मेळावे असो की जाहीर सभा. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे हे परवलीचे शब्द सुरुवातीलाच हमखास असायचे. त्याचवेळी अरे आव्वाज कुणाचा? शिवसेनेचा...असा जयघोष शिवसैनिकांमधून व्हायचा. तेव्हा एखादा मिनिट स्तब्ध उभे राहायचे आणि बाळासाहेबही प्रफुल्लित होऊन पुढे भाषणाला सुरुवात व्हायची. मुंबईच्या शिवाजी पार्कवर दसऱ्याला होणाऱ्या मेळाव्याची देखील ही खासियत. शिवसेनेत बंड झाल्याने यंदा हा मेळावा होणार की नाही,अशी शंका उपस्थित केली जात होती परंतु मुंबई हायकोर्टात उद्धव ठाकरे यांचाच अखेर विजय झाला. त्यांना विजयादशमीच्या दिवशी दसरा मेळावा घ्यायला कोर्टाने अनुमती दिली. त्यामुळे दसऱ्याला ढाण्या वाघाची डरकाळी घुमणार आहे. खरी शिवसेना आमचीच आहे. त्यामुळे दसरा मेळाव्याला शिवाजी पार्क आम्हालाच मिळायला हवे, ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाची याचिका कोर्टाने फेटाळून लावली.त्यामुळे ठाकरे गटाचा विजय झाला असून शिंदे गटाला सणसणीत चपराक बसली आहे.

कायदा सुव्यवस्थेचा मुद्दा उपस्थित करून मुंबई महापालिकेने दोनही गटांना मेळावा घेण्यास अनुमती नाकारली होती.त्यामुळे शुक्रवारच्या सुनावणीकडे उभ्या राज्याचे लक्ष लागून होते. कोर्टाच्या खंडपीठाने सदा सरवणकर आणि पालिकेचे सर्व आक्षेप फेटाळत शिवसेनेला दादरच्या शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेण्यास परवानगी दिली. गेल्या काही दिवसांत एकापाठोपाठ एक राजकीय धक्के बसलेल्या शिवसेनेसाठी हा मोठा दिलासा ठरला. सुनावणीवेळी मुंबई महानगरपालिकेची एक चूक या संपूर्ण निकालाच्यादृष्टीने टर्निंग पॉईंट ठरली. कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे पालिकेचे म्हणणे होते. पोलिसांची अतिरिक्त कुमक तैनात करा, असे सांगत कोर्टाने हा मुद्दाही निकाली काढला.

### इतके महत्त्व का?

महाराष्ट्रातील राजकारणाची दिशा आणि वाटचाल ठरवण्यात शिवसेनेच्या दसरा मेळाव्याचा निश्चितपणे उल्लेख करता येईल. दरवर्षी दसरा मेळाव्यात होणारे बाळासाहेब ठाकरे यांचे झंझावती भाषण हे जनतेच्या आकर्षणाचा विषय असायचे. मात्र, बाळासाहेबांच्या दसरा मेळाव्यातील भाषणाचे स्थान हे काही वेगळेच असायचे. त्यामुळे दसऱ्याच्या दिवशी रावण दहनानंतर बाळासाहेबांना ऐकण्यासाठी शिवाजी पार्कचे मैदान गर्दीने तुडूंब भरलेले असायचे. बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर त्यांचे राजकीय वारसदार असलेल्या उद्धव ठाकरे यांनी दसरा मेळाव्याला संबोधित करायला सुरुवात केली. बाळासाहेब यांच्या पश्चातही दसरा मेळाव्याची जादू ही जराही ओसरली नाही.

### वकील जहाँबाज ठरले



ठाकरेंच्या वतीने ज्येष्ठ वकील अस्पी चिनॉय यांनी खिंड लढवली आणि त्यांनी युक्तीवादातून ठाकरे यांना शिवतीर्थ मिळवून दिले. ठाकरेंचा विश्वास सार्थ ठरवणारे चिनॉय हे प्रसिद्धी झोतात आले. चिनॉय हे मुंबई उच्च न्यायालयातील सर्वात ज्येष्ठ वकिलांपैकी एक आहेत. मुंबईतील सेंट झेवियर्स कॉलेज आणि गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमध्ये शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात प्रॅक्टिस सुरु केली. संवैधानिक आणि व्यावसायिक केसेस, याशिवाय जनहित याचिका लढवण्यात त्यांचा हातखंडा मानला जातो.

### हा मुद्दा प्रभावी ठरला...

शिवाजी पार्कचे मैदान हे वर्षभरात काही कार्यक्रमांसाठी राखीव असते.त्यात शिवसेनेचा दसरा मेळावा नमूद आहे.तसा जीआर राज्य शासनाने २०१२मध्ये जारी केल्याचे माहीतगार सांगतात.त्यानुसार दसरा मेळाव्यासाठी शिवाजी पार्कवर शिवसेनेचा हक्क पोहचतो.हा मुद्दा कोर्टात प्रभावी ठरला.

### ५६ वर्षांची परंपरा...



दादरमध्ये १९६७ मध्ये शिवसेनेची स्थापना झाली होती. त्यानंतर लगेच दुसऱ्या वर्षापासून बाळासाहेबांनी दसरा मेळाव्याची सुरुवात केली. जवळपास ५६ वर्षांपासून शिवसेनेच्या दसरा मेळाव्याची परंपरा सुरू आहे. याआधी चार वेळा दसरा मेळावा काही कारणांनी होऊ शकला नव्हता. यंदा शिवसेनेतील अभूतपूर्व बंडानंतर, तसेच महापालिकेने शिवाजी पार्कची जागा दसरा मेळाव्यासाठी नाकारल्यानंतर पाचव्यांदा शिवसेनेचा दसरा मेळावा खंडित होता होता राहिला. दसरा मेळावा आणि शिवसेना हे समिकरणच आहे. २००६ नंतर २००९ मध्ये दुसऱ्यांदा दसरा मेळावा होऊ शकला नव्हता. २००९ मध्ये विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने शिवतिर्थावर दसरा मेळावा झाला नव्हता. त्यानंतर २०१४ मध्येही विधानसभेच्या निवडणुकीदरम्यान आचारसंहिता लागल्याने तिसऱ्यांदा दसरा मेळावा होऊ शकला नव्हता. शिवसेनेचा दसरा मेळावा आजपर्यंत शिवाजी पार्कवरच झाला आहे. मेळाव्याच्या जागेत आजवर कधीही बदल झालेला नाही. बाळासाहेब ठाकरे हे दसरा मेळाव्याच्या दिवशी शिवसैनिकांना नवा कार्यक्रम द्यायचे. त्यामुळे शिवसैनिक दरवर्षी न चुकता विचारांचे सोने लुटण्यासाठी दसऱ्याच्या दिवशी शिवाजी पार्कवर आवर्जून यायचे. त्यानुसार शिवसैनिक पुढील कामाला लागत असत.

## शहरातील बेवारस घरे महापालिका ताब्यात घेणार

✔ सुराज्य/सोलापूर

शहर परिसरातील असणारी बेवारस घरे महापालिका ताब्यात घेणार असल्याची माहिती आयुक्त पी. शिवशंकर यांनी दिली आहे. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत महापालिकेने सोलापूर शहरातील विविध झोपडपट्टीचे सर्वेक्षण केले होते. यामध्ये सुमारे ७५० घरे बेवारस म्हणजे घराला मालक नसलेल्या स्थितीत आढळली आहेत. ही घरे बंद आणि पडलेल्या अवस्थेत आहेत यामध्ये काही सिमेंटच्या तसेच विटांच्या घरांचाही समावेश आहे.

अनेक वर्षांपासून या घरात कोणीही राहत नसल्याचे लक्षात आल्यानंतर महापालिकेने आता ही घरे ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला आहे. लवकरच या घरांची यादी महापालिका जाहीर करणार आहे, असे आयुक्त पी शिवशंकर यांनी सांगितले. महापालिका ताब्यात घेणारी घरे ही गरजू लोकांना देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात येणार असल्याचेही आयुक्तांनी सांगितले.

## धान्य वाटपात अनियमितता ६५ रेशन दुकानदारांना नोटिसा



✔ **सोलापूर** : धान्य वाटपातील अनियमितता, दप्तर उपलब्ध नाही, दुकानाचा पत्ता एका ठिकाणचा आणि कामकाज व धान्यसाठा दुसऱ्याच ठिकाणी यासह इतर कारणावरून शहरातील ६५ रेशन दुकानदारांना अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे यांनी कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत.

या नोटीसीला उत्तर देण्यासाठी आठ दिवसांची मुदत दिली असून मुदतीत व समाधानकारक उत्तर आले नाही तर दुकानदारांवर कारवाई करण्याचा इशाराही नोटीसीत देण्यात आला आहे. शहरातील अनेक रेशन दुकानांमधून धान्य मिळत नसल्याची तक्रार लाभार्थ्यांसह आमदार प्रणिती शिंदे यांनी अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांकडे केली होती. याची दखल घेत अन्नधान्य वितरण अधिकारी शिंदे यांनी नायब तहसीलदारांच्या नेतृत्वाखाली भरारी पथके नियुक्त करून चारही परिमंडळातील दुकानांची तपासणी करण्याचा आदेश दिला होता. भरारी पथकाने जवळपास साडेतीनशे रेशन दुकानांची तपासणी केली होती. या तपासणीत पथकातील सदस्यांना दुकानदारांकडे अनेक गंभीर बाबी आढळून आल्या होत्या. त्यामध्ये दरमहा रीतसर धान्य वाटप केले जात नाही. लाभार्थ्यांना पावत्या दिल्या जात नाहीत, धान्याचा प्रत्यक्ष आणि दप्तरातील साठ्यात तफावत, गोदामाचा पत्ता एका ठिकाणी आणि धान्यासाठी दुसऱ्याच ठिकाणी असे प्रकार आढळून आले होते. पथकाने अहवाल तयार करून तो अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्याकडे सादर केला होता. शहरातील ६५ रेशन दुकानदारांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. संबंधित रेशन दुकानदारांनी येत्या आठ दिवसात या नोटीसीला उत्तर द्यायचे आहे. उत्तर समाधानकारक वाटले तर रेशन दुकानदारांना दिलासा मिळेल. अन्यथा दंड, निलंबन, बडतर्फ अशी कारवाई अटळ आहे.

## सुरत-चेन्नई महामार्ग बाधितांना ऑक्टोबरमध्ये मिळणार मोबदला

### जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांची माहिती

✔ सुराज्य/सोलापूर

बहुचर्चित सुरत-चेन्नई ग्रीन कॉरिडार महामार्गासाठी जमिनी दिलेल्या बाधित शेतकऱ्यांना ऑक्टोबर महिन्यापासून टप्प्याटप्प्याने मोबदला वाटप करण्यात येणार असून डिसेंबरअखेर भूसंपादनाची संपूर्ण प्रक्रिया पार पाडली जाईल, असे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी सांगितले.

सुरत-चेन्नई ग्रीन कॉरिडॉर महामार्ग हा केंद्र सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी आवश्यक असलेल्या जमिनींचे संपादन करण्याची मोहीम सध्या सुरू आहे. भूसंपादनासाठी आवश्यक असलेल्या प्राथमिक बाबींची पूर्तता जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आली आहे. जिल्ह्यातील बार्शी, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट या तीन तालुक्यांतून हा महामार्ग जाणार आहे. त्याची लांबी सुमारे १५४ किलोमीटर इतकी आहे. तीन तालुक्यातील ३५ गावांतून हा महामार्ग जात आहे. त्यासाठी ९३६ शेती गटातील ६४२.१२ हेक्टर जमिनीच्या संपादनाची प्रक्रिया सुरू आहे. बाधित शेतकऱ्यांना पहिल्या टप्प्यात बार्शी तालुक्यातील १२ गावांतून वाटप सुरू करण्यात येणार आहे. त्यानुसार टप्प्याटप्प्याने सर्वच बाधितांना मोबदल्याचे वाटप केले जाणार आहे.

जिल्हा प्रशासन व भूसंपादन विभागाच्यावतीने जमीन संपादनाची प्रक्रिया वेगाने राबविली जात आहे. पावसामुळे अक्कलकोट तालुक्यातील काही गावातील भूसंपादन राहिले होते. तेही काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. दरम्यान संपूर्ण भूसंपादनाची प्रक्रिया डिसेंबरपर्यंत पूर्ण होईल. जानेवारी २०२३ मध्ये बाधित सर्व शेतकऱ्यांना त्याचा मोबदला मिळणार आहे.



## ५४ मीटर बाह्य रस्त्यावरील बाधित होणाऱ्या ४४ कुटुंबांचे स्थलांतर

### महापालिका प्रशासनाकडून दोन ठिकाणी पुनर्वसनाचे नियोजन

✔ **सोलापूर** : छत्रपती संभाजी महाराज चौकापासून अवंती नगर पुढे जाणाऱ्या ५४ मीटर बाह्यवळण रस्त्याच्या कामातील बाधित ४४ कुटुंबांचे पुनर्वसन करण्याचा अंतिम निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला असल्याची माहिती महापालिकेचे आयुक्त पी. शिवशंकर यांनी दिली. दरम्यान, आणखी काही संमती न दिलेल्या कुटुंबांसाठी देखील त्यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही आयुक्त पी. शिवशंकर यांनी सांगितले.

५४ मीटर बाह्य वळण रस्त्याचे काम गेल्या अनेक वर्षापासून रखडले असून यासाठी महापालिका प्रशासनाकडून सतत प्रयत्न सुरू होते. यामध्ये बाधित होणाऱ्या घरांच्या लोकांशी अनेक वेळा चर्चा सुनावणी आणि पुनर्वसनासंदर्भात ही निर्णय घेण्यात आला होता. मात्र काही कारणावरून पुढील प्रक्रिया ही थांबली होती. ५४ मीटर बाह्य वळण रस्त्यासाठी देशमुख प्लॉट, हांडे प्लॉट आणि देशमुख-पाटील वस्ती येथील सुमारे ५० हून अधिक घरे बाधित होणार होती. यावर प्रारंभीच्या काळात मोठा प्रश्न देखील उपस्थित झाला होता. मात्र महापालिका प्रशासनाने सातबारा उतारा असलेल्या घरांच्या पुनर्वसनाची जबाबदारीही घेतली होती. या संदर्भात तेथील नागरिकांबरोबर अनेक बैठका देखील पार पडल्या. अखेर या प्रकरणात घेतलेल्या निर्णयानुसार पुनर्वसन ची प्रक्रिया महापालिका प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे.



यामध्ये देशमुख प्लॉट येथील सातबारा उतारा असलेल्या ९ जणांचे पुनर्वसन तेथीलच रेल्वे ट्रॅक जवळ असलेल्या महापालिकेच्या जागेत करण्यात आले आहे. यासाठी त्यांनी संमती दर्शविली असून उर्वरित इतरांच्या ही पुनर्वसनासाठी प्रयत्न सुरू आहेत. याचबरोबर हांडे प्लॉटमधील २५ कुटुंब आणि देशमुख पाटील वस्तीमधील १० जण अशा ३५ जणांचे पुनर्वसन महापालिकेच्या जागेत असलेल्या लेप्रसी कॉलनीत करण्यात येणार आहे. या संदर्भात त्यांना नोटिसा बजावण्यात आल्या असून नोटिसांची कार्यवाही देखील पूर्ण झाली आहे. महापालिका प्रशासनाच्या या यशस्वी कार्यवाहीमुळे गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या रस्त्याचे काम पूर्ण होऊन वाहतूक देखील शहराबाहेरून मार्गी लागेल अशी आशा आता व्यक्त केली जात आहे.

### ... तर त्यांच्यावर कारवाई करू : आयुक्त

ज्या जागांची नोटरीद्वारे खरेदी-विक्री झाली आहे. अशा कुटुंबांना रेल्वे पूल परिसरातील महापालिकेच्या जागेवर पर्यायी व्यवस्था करण्यात येत आहे. तर इतरांना लेप्रसी कॉलनी परिसरात भाडेतत्वावर जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.३० सप्टेंबरपर्यंत या सर्व ४४ कुटुंबांची स्थलांतर प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असून यापुढे ५४ मीटर रस्त्याच्या बाधित ठिकाणी अडथळा ठरतील त्यांच्यावर बअसल्याची माहिती महापालिका आयुक्त शिवशंकर यांनी दिली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सध्या कोणता ऋतु 'चालु' आहे?

कल्याण
378-88-134

मेन बाजार
270-94-590

## परवाना रद्द झालेल्या 'लक्ष्मी'च्या ठेवीदारांची मदार भावी प्रशासकावर

▸ बँक विलिनीकरणासाठी एक वर्षभराचा वेळ ▸ कर्मचाऱ्यांच्या पगारी, पीएफ, इन्शुरन्स कंपनीची देणी देण्यासाठी होणार प्रयत्न

✔ सुराज्य/सोलापूर

भारतीय रिझर्व्ह बँके (आरबीआय) कडून परवाना रद्द झालेल्या श्री लक्ष्मी सहकारी बँकेच्या ठेवीदार, कर्मचाऱ्यांच्या थकीत पगारी, इन्शुरन्स कंपनीची देणी आदींची मदार भावी प्रशासकावर असणार आहे. त्यामुळे परवाना रद्द झाला असला तरी ठेवीदार, पगारी थकलेले कर्मचारी यांचा प्रश्न सुटण्याची चिन्हे आहेत.

गेल्या अनेक महिन्यांपासून प्रशासकांच्या हाती कारभार असलेल्या लक्ष्मी बँकेला रिझर्व्ह बँकेने परवाना रद्द करून बँकिंग क्षेत्रात खळबळ उडवून दिली आहे. परिणामी परवाना रद्द केल्यामुळे लक्ष्मी बँकेचे विलीनीकरण, विलीनीकरणासाठी इच्छुक असलेल्या पुण्याच्या बँका, शहर व जिल्ह्यातील शाखांमध्ये कार्यरत अधिकारी-कर्मचारी यांचे वेतन, ठेवीदारांच्या रकमा, थकबाकीदारांकडील थकबाकी आदींबाबत शहर-जिल्ह्यात चर्चेचा विषय बनला होता. परंतु कर्ज घेतलेले थकबाकीदार यांची सुटका होणार नसून



आरबीआयकडून नेमण्यात येणाऱ्या प्रशासकांकडून भविष्यात कडक कारवाई करून संबंधित वसुली केली जाणार असल्याची माहिती नाव न सांगण्याच्या अटीवर अधिकाऱ्यांनी दिली.

आरबीआयकडून लक्ष्मी बँकेचा परवाना रद्द केल्यानंतर येत्या काही दिवसांत प्रशासकाची नेमणूक करणार आहे. त्या प्रशासकाकडून कर्जदारांकडून थकित कर्ज वसुली सक्तीने करून घेऊ शकते. त्याच बरोबर कर्मचाऱ्यांचे थकलेले वेतन, पीएफचे पैसे, इन्शुरन्स कंपनीचे जवळपास दोनशे कोटींचे देणे आदी प्रश्न आरबीआयकडून सोडवले जाणार आहेत.

### वर्षभराची प्रतिक्षा...

लक्ष्मी बँकेच्या विलीकरणासाठी पुणे, मुंबई येथील बँका तयार होत्या. अशातच आरबीआयकडून परवाना रद्द झाला. त्यामुळे लक्ष्मी बँक विलीकरणासाठी बँका इच्छुक असताना परवाना रद्द झाल्याने पुढे काय? असा प्रश्न ठेवीदार, कर्मचारी, नागरीक यांच्यापुढे उपस्थित झाला होता. परंतु परवाना रद्द झाला असला, तरी इच्छुक बँका 'ड्यु डेलिगन्स रिपोर्ट' घेऊन पुढील एक वर्षापर्यंत आरबीआयकडे विलीकरणासाठी इच्छुक असल्याचा प्रस्ताव पाठवू शकतात. आणि त्यानंतर पुढील वर्षभरापर्यंत लक्ष्मी बँक विलीकरण करून घेऊ शकतात. त्यामुळे लक्ष्मी बँक विलिनीकरणाचा मार्ग पुढील वर्षभरापर्यंत मोकळा असल्याचे चित्र आहे.

# बारामती मिशन...

राज्यातील भाजपने बारामतीच्या राजकारणात विशेष लक्ष घातल्याचे दिसते. त्याला दिल्लीश्वरांचा पाठिंबा नक्कीच असेल. आपल्यापासून शिवसेनेला फोडले आणि हातात असलेली सत्ता हिरावून घेतली हा राग भाजप नेत्यांच्या मनात घर करून आहे. तेव्हा बारामतीकरांना अद्दल घडवण्याचा भाजप नेत्यांनी जणू चंगच बांधला आहे. बारामतीत आक्रमण करण्याच्याच इराद्याने भाजप नेत्या तथा केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन यांना बारामतीच्या दौऱ्यावर धाडण्यात आले आहे. गेल्या आठ ते दहा वर्षांत भाजप अनेक निवडणुकांमध्ये यशस्वी ठरताना दिसतो. गावपातळीपर्यंत पक्षबांधणी, त्याला समविचारी संघटनांची जोड तसेच कल्याणकारी योजनांचा तळागाळापर्यंत प्रसार व प्रचार अशी अनेक कारणे यामागे आहेत. आताही आगामी लोकसभा निवडणूक २०२४च्या दृष्टीने भाजपने तयारी सुरू केली आहे. पक्षाची संघटनात्मक ताकद कमकुवत असलेल्या देशभरातील १४४ तर राज्यातील १६ लोकसभा मतदारसंघांवर लक्ष केंद्रित केले आहे. त्यासाठी केंद्रीय मंत्र्यांवर या मतदारसंघांची जबाबदारी सोपवली गेलीय. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या कुटुंबीयांचा बालेकिल्ला असलेला पुणे जिल्ह्यातील बारामती मतदारसंघ सध्या चर्चेत आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन २२ सप्टेंबरपासून तीन दिवस या मतदारसंघात आहेत. या मतदारसंघाची जबाबदारी त्यांच्यावर आहे. याअंतर्गत येणाऱ्या सहा विधानसभा मतदारसंघांत २१ कार्यक्रम होणार आहेत. 'आम्ही अमेठी जिंकली आता बारामतीतही यश मिळवू', अशी घोषणा भाजपने केली आहे. उत्तरप्रदेशातील अमेठीमध्ये केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी २०१९मध्ये राहुल गांधी यांचा पराभव केला होता. मात्र बारामती आणि अमेठीतील स्थिती वेगळी आहे, असे राजकीय जाणकार म्हणतात.

बारामतीमध्ये १९७१पर्यंत काँग्रेस तर १९७७च्या जनता लाटेत संभाजीराव काकडे विजयी झाले. गेल्या ४५ वर्षांत पवार यांच्या कुटुंबातील किंवा पवार यांनी दिलेला उमेदवार विजयी झाला. गेल्या तीन निवडणुकांत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे येथून निवडून आल्या आहेत. २०१४मध्ये राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर जवळपास ७० हजार मतांनी पराभूत झाले. त्यावेळी जानकर यांनी कमळ चिन्ह घेतले असते तर सुप्रियांचे मताधिक्य आणखी कमी झाले असते असे विश्लेषक सांगतात. अर्थात हा अपवाद वगळता विरोधकांना या मतदारसंघात फारसे आव्हान उभे करता आलेले नाही. त्यामुळे २०२४मध्ये बारामती जिंकण्यासाठी भाजपने आत्तापासूनच प्रयत्न चालवल्याचे दिसते. एकूण सहा विधानसभा मतदारसंघ यामध्ये आहेत. यात बारामती, इंदापूर, भोर, पुरंदर, दौंड आणि खडकवासला यांचा समावेश आहेत. त्यात बारामतीमध्ये अजित पवार तर इंदापूरमध्ये दत्ता भरणे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आहेत. भोर व पुरंदरमध्ये अनुक्रमे संग्राम थोपटे व संजय जगताप हे काँग्रेसचे आहेत, तर दौंडमध्ये भाजपचे राहुल कुल तर खडकवासल्यात भीमराव तापकिर प्रतिनिधित्व करतात. संघटनात्मकदृष्ट्या या सहाही मतदारसंघांत राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद चांगली आहे. खडकवासला व दौंड येथे गेल्या म्हणजेच १९च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने आघाडी मिळवली होती. पुरंदर, भोरमध्ये भाजपचा फारसा संघटनात्मक विस्तार नाही.पुरंदरचे माजी आमदार विजय शिवतारे आता शिंदे गटात आहेत, तर भोरचे आमदार संग्राम थोपटे यांनी काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याची चर्चा झाली होती. विकासकामांसाठी ही भेट होती असा खुलासा थोपटे यांनी केला होता. त्यामुळे या दोन मतदारसंघांवर भाजपचे विशेष लक्ष असावे. भोरचा काही भाग पुणे शहराला जोडलेला आहे. इंदापूरमध्ये माजी मंत्री हर्षवर्धन पाटील हे आता भाजपमध्ये आहेत. येथे पाटील विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस असा जुना सामना आहे. खडकवासला हा शहरी मतदारसंघ आहे. भाजपसाठी चिंता बारामती विधानसभा मतदारसंघाची आहे. बारामती शहरात उद्योग, शिक्षण, सहकार क्षेत्रातील नामांकित अशा संस्थांची उभारणी करण्यात शरद पवार यांचे मोठे योगदान आहे. फेब्रुवारी २०१५मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बारामतीला भेट देऊन पवार यांचे कौतुक केले होते. पंतप्रधान झाल्यानंतर महाराष्ट्राला त्यांनी दिलेली पहिली भेट तीच होती हे विशेष. त्याच वर्षी तत्कालीन अर्थमंत्री अरुण जेटली यांनीही बारामतीचा दौरा केला होता. आता निर्मला सीतारामन या भेटीवर आल्या आहेत. बारामतीमध्ये पवार कुटुंबाला शह देणे कठीण आहे. संस्थात्मक कामामुळे लोक जोडले आहेत. मात्र, या भागातील शहरीकरणाची गती पाहता मतदार मोदींकडे आकृष्ट होईल, असा भाजपचा होरा आहे. त्या दृष्टीनेच केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या बारामती मोहिमेची चर्चा आहे. बघूयात कितपत यश येते?

सामाजिक

# इच्छामरणातील आजच्या नैतिक बाजू!

मानवी जीवन व्यवहारांना सर्वच पातळ्यांवर व्यापून वावरत असलेला मृत्यू हा नेहमीच तत्त्वज्ञ-संशोधकांच्या चिंतनाचा विषय राहिलेला आहे. जगातील सर्वच धर्म अंतत: मृत्यूविषयीच्या भयातून निर्माण झालेले आपण पाहू शकतो. मृत्यूनंतर काय याबाबत मार्गदर्शन नाही असे जगात अपवादात्मक धर्म आहेत. बव्हंशी तत्त्वज्ञाने अंतत: मृत्यूभयावर विजय मिळवत, असुरक्षित जीवनाला आध्यात्मिक पातळीवर सुरक्षिततेचा आभास कसा मिळू शकेल हे दर्शवण्यासाठी तत्त्वज्ञांचे बव्हंशी लेखन झाले आहे हेही आपल्या लक्षात येईल. किंबहुना नीतिशास्त्राचीच उपज ही आदिम मानवी भयावर मात करण्यासाठी झाली आहे. विज्ञानही मनुष्य अमर जरी नसला तरी त्याचे एकूणातील आयुष्य कसे वाढेल या प्रयत्नांत आहे. स्वत: अमर नसलो तरी देवता अमर्त्य आहेत, ही श्रद्धा बव्हंशी धर्म व्यक्त करतात व त्यांच्या साधना, पूजा-प्रार्थनांनी अंतिम मोक्ष, साल्वेशन, निब्बाण इ. प्राप्त होईल अशी आशाही दाखवतात.

मृत्यू कोणाला सहसा नको असतो. किंबहुना तो कसा लांबविता येईल, असाच प्रयत्न प्रत्येकजण करत असतो. प्रतिक्षणी मनुष्य कोणा-न-कोणा जीवाला मरताना पाहत असतो...पण आपण स्वत: मात्र मरणार नाही, यावर त्याची श्रद्धा असते. पण वर्तमान जगात मात्र उतारवयात जगणे असह्य व्हावे व मृत्यू हाच श्रेय:स्कर अथवा प्रेय वाटावा असेही जगणे अनेकांच्या वाट्याला येत असते. त्यांना मृत्यूची दया नव्हे तर अधिकार हवा असतो. दयामरण हे मानसिक क्रिया विस्कळीत झालेल्या व कितीही प्रयत्न केले तरी पूर्ववत जगणे अशक्य असलेल्या व्यक्तींबाबत असले पाहिजे. भविष्य अनिश्चित असल्याने कोणतीही व्यक्ती मानसिक संतुलित अवस्था असताना अशा बाबींची कल्पना करून स्वेच्छामरणाचे मृत्युपत्र करेल, याची संभावना नाही.

'स्वेच्छामरण' हा पुरातन काळापासून चालत आलेला एक मार्ग आहे. स्वेच्छेने देवतांना बळी जाणे, बळी म्हणून विकले जाणे याबरोबरच जीवंत समाधी घेणे, स्वत:ला पेटवून घेणे अथवा जलसमाधी घेणे असे अनेक मार्ग अगदी अलीकडच्या काळापर्यंत आपल्याला पहायला मिळतात. इच्छामरणाचे वरदान वगैरे भाकड भाग बाजूला काढला तरी भीष्मांनी स्वत:च मृत्यू स्वीकारला. द्रोणानेही तसेच केले. गांधारी, कुंती व धृतराष्ट्र यांनीही वणव्यात स्वत:ला जाळून घेतले. यांतील सत्य अथवा रुपकात्मता काहीही असो, स्वेच्छामरणाचे आकर्षण समाजांत या ना त्या पातळीवर वावरत होते एवढे तरी आपण निश्चयाने म्हणू शकतो आणि धार्मिक भावनांनी प्रेरित स्वेच्छा मरण (आत्महत्या नव्हे) सामाजिक/सांस्कृतिक विरोध असल्याचे दिसत नाही.

आपले जीवन तृप्त झाले आहे अथवा आपले लौकिक कार्य संपले आहे, या भावनांनी विचारपूर्वक केलेला निर्णय व त्याची अंमलबजावणी म्हणजे 'स्वेच्छामरण' असे आपण वरकरणी म्हणू शकतो. पण तृप्तता अथवा लौकिक कार्य हे शब्द फसवे असून केवळ भावनिक असू शकतात हेही उघड आहे. अनेक साधू-संतांनी आपले लौकिक कार्य संपले असे घोषित करून तरुण वयातही समाधी घेतली. पण नैतिकतेच्या व्याख्या व समाजस्थिती बदलत असते. शारीरिकदृष्ट्या विकलांग झालेल्या, असह्य यातना भोगणाऱ्या व्यक्तीला जगवत ठेवायचे व जगायचे हे अनैतिक आहे. त्यामुळे त्यांना तरी दयामरणाचा अधिकार असला पाहिजे व विशिष्ट स्थितीत व्यक्तीच्या इच्छेचाही समावेश असला पाहिजे. पण आधुनिक काळात जगण्याचा अधिकार सर्वोपरी झाल्याने शारीरिक व्याधींमुळे यातना भोगत असलेल्या किंवा जगण्यातील अर्थच हरपून बसलेल्या परावलंबी व्यक्तींनाही दया-मरण अथवा इच्छा-मरणाचा अधिकार नाही.. आताही प्रक्रिया किचकट करूनच दयामरणाचा अधिकार देण्यात आलेला आहे. इच्छामरण मान्य होणे ही तर अजून फार दूरची बाब आहे. 'लिव्हिंग विल' हा सर्वोच्च न्यायालयाने वापरलेला शब्द तर अनेकांच्या बाबतीत निरर्थक ठरतो याचेही भान नाही.




> मृत्यू ही अपरिहार्य घटना नैसर्गिक वृद्धापकाळाने जशी घडून येते तशीच ती युद्धांत, नैसर्गिक प्रकोपांत, अपघातांत, खूनादी घटनांतही घडून येते. किंबहुना अनिश्चित असणे हेच मृत्यूचे भय वाटण्याचे मोठे कारण असते. असे असले तरी भावनोद्रेकात आत्महत्याही घडत असतात. ऐहिक वा मानसिक कारणांनी स्वत:चे जीवन स्वत: संपवणे हा नुसता कायदेशीर नव्हे तर नैतिक/धार्मिक गुन्हा मानला जातो. जन्माला आल्यानंतर व्यक्ती ही स्वतंत्र उरत नसून ती एकूणातील समाजाशी उत्तरदायी असते, असा भाव त्यामागे आहे. शिवाय जगण्याचा अधिकार हे तत्त्व आपल्या राज्यघटनेत कलम २१ अन्वये समाविष्ट आहे. पण मरण्याचा अधिकार नाही. अलीकडेच विशिष्ट स्थितीत दया मरणाला सर्वोच्च न्यायालयाने अनुमती दिली असली तरी ती प्रक्रिया किचकट आहे. इच्छामरणाबाबत अजूनही समाज मौन आहे असे म्हणता येईल. जगण्याचा अधिकार आहे तर जगणेच निरर्थक अथवा यातनादायी झाले तर मरण्याची अनुमती का नको हा प्रश्न यामागे आहे.

गेल्या शतकापासून एकूणातील स्थिर समाजव्यवस्थाच ढवळून निघाली असून मानवी नातेसंबंध नवीन मिती धारण करत आहे व त्यातील गतीशास्त्रही विस्मित करणारे आहे. समाजशास्त्रही त्यावर फारसा सुखकर तोडगा काढू शकलेले नाही हे आपण रोजच पाहतो. काळ बदलला नसून माणसे बदलली आहेत. कारण काळ घडवणारी मुळात माणसेच आहेत. असे असले तरी जीवनातील व्यामिश्रता आता समाजकेंद्रीत न होता व्यक्तिकेंद्रीत झाल्याने एक भयावह स्थिती निर्माण झाली आहे.

आधुनिक विज्ञानाने मानवी जीवनमान वाढले आहे हे खरे आहे पण, ते आरोग्यदायी असतेच असे नाही. शरीरव्याधी ते दोन पिढ्यांतील संघर्षांमुळे उतारकाळ हा तृप्त नव्हे तर वेदनादायक (शारीरिक आणि मानसिक पातळीवर) बनत चालला आहे. एकाकीपणा, थकलेली वा व्याधिग्रस्त गात्रे, भावनिक आधारांची कमतरता तर कोठे होणारा शारीरिक व मानसिक छळ यातून खूप मोठा वर्ग आज चालला आहे. मे २०१३ मध्ये गुजरातमधील एका मराठी दांपत्याने मुलगा व सुनेकडून होणाऱ्या छळाला कंटाळून जिल्हाधिकाऱ्याकडे इच्छामरणाची परवानगी मागितली होती. अशी असंख्य प्रकट-अप्रकट प्रकरणे नित्यश: घडत असतात. याचा निर्वाह नेमका काय हा आपल्या समाजशास्त्रज्ञांसमोरील मुख्य प्रश्न असला पाहिजे. दयामरण आणि स्वेच्छामरण हे दोन्ही एकाच पातळीवर आणले जायला हवे व त्यांना मान्यता असायला हवी. व्याधिग्रस्त, दुर्लक्षित अवस्थेत, सृजनशीलतेचा अस्त झाल्यानंतर अपमानित जीवन अन्यांच्या मेहरबानीवर जगणे व तसे जगायला नैतिक व कायद्याचा विचार करून भाग पाडणे हीच अनैतिकता आहे असे म्हणता येते. कोणत्याही सामाजिक संस्था अशा समस्या पूर्णपणे हाताळू शकत नाहीत. कारण अशा घटनांचा विस्फोट होत आहे हे आपल्या लक्षात येईल. अशा परिस्थितीत इच्छामरणाचा निर्णय विचारपूर्वक घेतला जात असेल तर त्याची अंमलबजावणी होण्यास काय हरकत असावी?

इच्छामरण आणि दयामरण या सर्वस्वी वेगळ्या बाबी आहेत. उतारवयात व्यक्ती शारीरिकदृष्ट्या विकलांग अथवा निर्णय घेण्यास अक्षम नसला तरीही मानसिक यातनांना तोंड देणे अशक्य झालेल्यांनाही मरणाची अनुमती मिळणे म्हणजे इच्छामरण. दयामरणासाठीची कायदेशीर व नैतिक स्थिती अगदी उलटी आहे. असे असले तरी अनावश्यक जगून समाजावर भार बनण्यापेक्षा जीवनातून मुक्ती मिळवण्याचा म्हणजे जगण्याचा अधिकार जसा आहे तसाच सन्माननीय मरणाचाही अधिकार आहे हे मान्य झाले पाहिजे. अशी परवानगी कोणत्या स्थितीत देता येऊ शकते याची विधीसंहिता बनवता येऊ शकते. काळाप्रमाणे सामाजिक नीती बदलली पाहिजे. आत्महत्येचा निर्णय हा क्षणिक भावनिकतेतून घेतले जातात. इच्छामरणाचे तसे नाही. सुदृढ समाजासाठी यावर आपल्याला नव्याने चिंतन करायला हवे.

**- संजय सोनवणी**

टुडेज ब्लॉग

# शेअर बाजारातील मराठी माणूस

**शेअर बाजार हे नाव समोर आलं की दोन प्रकारच्या शंका नेहमीच उपस्थित केल्या जातात. एक म्हणजे शेअर बाजारात खूप नुकसान होतं आणि त्यात कधीच फायदा होत नाही. आणि दुसरी शंका म्हणजे शेअर बाजारात मराठी माणसाचं अस्तित्व काय?**

आकडेवारीच बघायची असेल तर आज घडीला देशात एकूण १० कोटी डिमॅट खाती उघडली गेली आहेत आणि त्यातील सर्वाधिक डिमॅट खाती ही महाराष्ट्रात आहे आणि बीएसई च्या आकडेवारीनुसार त्यांच्या प्लॅटफॉर्म वर महाराष्ट्रातून गुंतवणूक करणाऱ्यांचं प्रमाण इतर राज्यांच्या तुलनेत जास्त आहे. त्यामुळे शेअर बाजारात मराठी माणूस कुठे आहे याचं उत्तर मिळालं असेल. पण आपला आजचा विषय विशेष आहे जो प्रत्येक मराठी माणसाला विचार करायला लावणारा आहे. आज आपण अशा एका सामान्य मराठी माणसाचा शेअर बाजारातील प्रवास जाणून घेणार ज्यामध्ये वर नमूद केलेल्या दोन्ही शंकांची उत्तरं मिळतील. महादेव कुटरेकर! मुंबईस्थित एक सामान्य नोकरदार मराठी माणूस. महादेव कुटरेकर यांचा १९५५ सालचा जन्म. महादेव कुटरेकर यांनी १९७८ साली मुंबईतील एका या कंपनीत नोकरी सुरू केली. आजही Fevicol ची जाहिरात अनेकांच्या स्मरणात असेल. ते ञ्शींळलेश्र हे उत्पादन बनवणारी कंपनी म्हणजे Pidilite Industries. नोकरी करत असताना कंपनीने १९८९ साली कर्मचाऱ्यांना काही शेअर्स देऊ केले. त्यामध्ये महादेव कुटरेकर यांनी एकूण २००० रुपये गुंतवणूक करत ४० शेअर्स मिळवले. म्हणजे अंदाजे ५० रुपयांना एक शेअर मिळाला. आजच्या काळातही शेअर्समध्ये गुंतवणूक करण्यापूर्वी दहावेळा विचार केला जातो पण महादेव कुटरेकर यांनी तेंव्हा शेअर्समध्ये गुंतवणूक केली. खरं तर हा निर्णय घेणे हेच सर्वात मोठं धाडस असतं. ते महादेव कुटरेकर यांनी केलं. स्वतः त्या कंपनीत कार्यरत असल्याने त्यांना कंपनीच्या उज्वल भवितव्याबाबत खात्री होतीच. जग आर्थिक उदारीकरणाच्या उंबरठ्यावर उभं होतं आणि भारतातही आधुनिकीकरणाचे वारे वाहू लागले होते. शेअर बाजार हे या वातावरणात ठळकपणे उठून दिसणारं क्षेत्र. त्यावेळी आजसारखे डिमॅट अकाऊंट नव्हते. शेअर्सचे व्यवहार कागदोपत्री व्हायचे ज्याला आपण शेअर सर्टिफिकेट म्हणतो.



जोपर्यंत महादेव कुटरेकर यांना पैशांची गरज भासत नव्हती तोपर्यंत त्यांनी शेअर्स विकण्याचा विचार केलाच नाही. काही काळाने त्यांना पैशांची गरज असल्याने त्यांच्याकडील ४० पैकी २० शेअर्स त्यांनी विकून टाकले. कंपनीच्या शेअर्सचं बीएसई वर पब्लिक लिस्टिंग हे १९९३ साली झालं. ज्याला आपण आयपीओ म्हणतो तोच हा प्रकार.यातून हेच सांगता येईल की शेअर बाजारात मराठी माणूस गुंतवणूक करत नाही आणि इथे फक्त नुकसानच होतं असं म्हणणं ही अंधश्रद्धा आहे. आपल्याला चांगला व्यवसाय करणाऱ्या, चांगला बिझनेस असणाऱ्या, चांगली मॅनेजमेंट असणाऱ्या शेअर्समध्ये गुंतवणूक करायची आहे आणि दीर्घकाळ ते शेअर्स आपल्याला जपायचे आहेत. ज्याप्रमाणे आपण आपली प्रॉपर्टी जपतो तोच विचार इथेही करायचा आहे. अल्पावधीत श्रीमंत होण्याची स्वप्ने बघणे गैर नाही पण आपली गरज ओळखून गुंतवणुकींचं उत्तम क्षेत्र म्हणून आपल्याला याकडे बघायचं आहे. तर आणि तरच या क्षेत्रात मराठी माणूस पुढे जाईल आणि जास्तीत जास्त नफा मिळवेल!

**- अभिषेक बुचके.**

बोधकथा

## चांगले विचार



एक रामपूर नावाचे गाव होते. त्या गावाशेजारी खूप मोठे जंगल होते. त्या गावातून दुसऱ्या गावात जाण्यासाठी त्या जंगलातून जावे लागत असे. अतिशय गरज असेल तेव्हाच लोक शेजारच्या गावात जात असे. त्यामुळे हे जंगल निर्जन होते. जंगलात फक्त जंगली प्राणी असायचे. जंगली प्राण्यांमुळे लोकांना आजपर्यंत कधीच त्रास झाला नव्हता.

एकदा एक गरीब माणूस जंगलातून फिरत चालला होता. जंगलात दूरवर आणि त्याच्यासोबत कोणीही नव्हते. बरेच अंतर पार केले असताना तो खूप थकला होता आणि त्याला खूप तहान लागली होती आणि भूकही लागली होती. एक डेरेदार झाड पाहून तो त्याच्या खाली बसला आणि विचार करु लागला की, आपल्याला इथे कोणी मिष्टान्न भोजन व थंडगार पाणी आणून देईल तर किती बरे होईल? योगायोगाने तो ज्या झाडाखाली बसला होता तो होता कल्पवृक्ष. त्याने इच्छा केल्याबरोबर ती पूर्ण झाली आणि त्याच्या पंचपक्वान्नाचे जेवण प्रकट झाले. त्या माणसाला वाटले की बहुधा देवच प्रसन्न झाला असावा. त्याने प्रार्थना केली की मला पोते भरुन मोहरा मिळाव्यात म्हणजे माझे दारिद्र्य नाहीसे होईल. तीही इच्छा लगेच पूर्ण झाली. इतक्या मोहरा त्याने आयुष्यात पाहिल्याही नव्हत्या. पण आता त्याला भीती वाटू लागली. या मोहरांच्या लोभाने चोर इथे आले तर काय करायचे? ते धन तर लुटून नेतीलच, पण आपल्यालाही ठार मारतील. हे मनात येताच तिथे चोर आले आणि त्यांनी मोहरांची पिशवी उचलली आणि त्या गरीब माणसाला ठारही केले.

**तात्पर्य - एखादी संधीचा चांगला उपयोग करुन घ्यावा. त्या संधीमुळे आपले नुकसान तर होणार नाही असे काही करु नये. कल्पवृक्ष आणि सामर्थ्याची कल्पनाच नसल्याने कार्यकर्ते प्रत्येकाने असे दरिद्री संकल्प करु नये.**

जन्म हा अखेरचा

## परकायस्थल - २

डोळे रूप पाहू इच्छितात, कान ऐकू इच्छितात, जीभ स्वाद चाखू पाहते, नाक गंध हुंगण्याची इच्छा धरते आणि त्वचा स्पर्शानुभव घेऊ पाहते. याचे कारण काय? तर वासना हेच त्याचे मूळ कारण होय. अनेक जन्मांत जीवात्मा जे जे काही भोगत आला आहे, त्या साऱ्यांचे संस्कार त्याच्या मनावर झालेले असतात. जो संस्कार प्रबळ होतो, त्याप्रमाणे वर्तन करण्याची त्याची इच्छा होते.

जीवात्म्याने अगणित जन्म घेतलेले असतात, त्या जन्मांत असंख्य कर्मे केलेली असतात. केवळ विषयभोग घेण्याचे कर्मच त्याने केले असते तर त्याला पुन्हा जन्म घेण्याची गरज राहिली नसती. म्हणूनच एका कवीने म्हटले आहे :- **वपुः प्रादुर्भावादनुमितमिदं जन्मनि पुरा**

**पुरारे न क्वापि क्वचिदपि भवन्तं प्रणतवान्।**

**नमन्मुक्तः सम्प्रत्यहमतनुरग्रेप्यनतिमान् ।**

**इतीशः क्षन्तव्यस्तदिदमपराधद्वयमपि ।।**

कवी ईश्वराजवळ जाऊन प्रार्थना करतो की, परमेश्वरा! माझ्याकडून दोन अपराध घडले आहेत, त्याबद्दल मला क्षमा करा. मला हे शरीर लाभल्यामुळे मी असे अनुमान करू शकतो की, याआधी मी जेवढे जन्म घेतलेले आहेत, त्या जन्मांत मी आपल्याला कधीही नमस्कार केलेला नाही. **(क्रमशः) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

## भारताला सुरक्षा समितीत अमेरिकेचे प्रयत्न!

आज युनोमध्ये सुरक्षा समितीत कायम पाच राष्ट्रे आहेत. त्यामध्ये अमेरिका, चीन, ब्रिटन, फ्रांस व रशिया यांचा समावेश आहे भारत हा जगात आज लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या स्थानावर आहे.

जगातील तिसऱ्या क्रमांकावर अर्थ व्यवस्था येण्यासाठी भारताचे जोरदार प्रयत्न सुरु आहेत. जगाला भारताला डावलून सुरक्षा समितीची स्थापना करणे म्हणजे जगातील सात पैकी एका व्यक्तीला डावलण्यासारखे आहे.

आज सुरक्षा समितीचे कायम स्थानाकरिता जगातील सुरक्षा समितीतील चार राष्ट्रांचा पाठींबा भारताला आहे. केवळ चीनच्या विरोधामुळे हे शक्य होत नाही. भारतासह जर्मनी व जपान यांना सुरक्षा समितीचे कायम सभासदत्व मिळावे या दृष्टीने अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायोडिन यांनी प्रयत्न सुरु केले असल्याचे वृत्त आहे. अर्थात याला चीनचा कितपत पाठींबा आहे हे मात्र कळू शकलेले नाही. जगाला न्याय देण्यासाठी व सुरक्षा समिती अधिक व्यापक करण्यासाठी भारताला स्थान मिळणे अत्यंत आवश्यक आहे. भारताचे परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी नुकतेच याबाबतीत जाहीर वक्तव्य केले असून, भारतासारख्या जगातील मोठ्या लोकसंख्येला सुरक्षा समितीत स्थान नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. अमेरिकेच्या प्रयत्नाला कितपत यश मिळेल, हे नजीकच्या काळात दिसेलच.

**- शांताराम वाघ, पुणे.**

# घरकामाचा सासुरवास!

चूल आणि मूल यापुरतेच सीमित असलेले महिलांचे विश्व कालानुरूप विस्तारत गेले आहे असे आपण मानतो. पूर्वीच्या स्त्रिया सातत्याने घरात राबत असत, सर्व पदार्थ स्वयंपाक घरातच बनवणे, इतर सर्व कामे घरातली महिलाच करणार, पै पाहुणा यांचे आदरातिथ्य करणे, लहान मुले सांभाळणे, सणवार, व्रतवैकल्ये, वडीलधाऱ्यांची सुश्रुषा करणे इथपासून ते शेती असल्यास शेतीतील काम करणे अथवा करवून घेणे या जबाबदाऱ्या महिला लीलया पेलत होत्या. त्याकाळी कोणत्याही प्रकारच्या सोईसुविधा नव्हत्या. कोणतीही गोष्ट बाजारात सहजासहजी उपलब्ध नव्हती. महिलांवर शैक्षणिक, व्यावसायिक अथवा नोकरी या जबाबदाऱ्या नव्हत्या, आर्थिक बाबीत त्यांना फारच महत्त्व दिलं जात नव्हतं आणि पुरुष प्रधान संस्कृतीमुळे त्यात कोणताही कमीपणा महिलांना वाटतं नव्हता. मुळात एकत्र कुटुंबात अनेक महिला असल्यामुळे घरातीत कामांची वाटणी होऊन, एकमेकींना हातभार लावून काम आटोपली जायची.

> घरकामावरून सासुरवास हा प्रकार आजच्या मुलींना पचवणं आणि पेलवणं कठीण होऊन बसलं आहे. सासू किंवा घरातील नात्याने, मानाने आणि वयाने मोठ्या असलेल्या महिलांनी आपल्याकडून त्याच अपेक्षा कराव्यात का ज्यात त्यांचं आयुष्य गेलं? हे स्वीकारणे आजच्या तरुण मुलींना शक्य नाही. हे जुने लोक स्वतःही बदलत नाहीत आणि आम्हांला पण मनाजोगतं जगू देत नाहीत, असा एकंदरीत समज नवीन पिढीतील महिलांचा आहे. घरकामाला बाई किंवा कामवाली न लावता सुनेकडून या कामांची अपेक्षा ठेवणे म्हणजे मुद्दाम केलेला छळ असं आजच गणित झालं आहे.

त्या काळी या सर्व घरकामांची सवय महिलांना अंगवळणी पडलेली होती आणि त्या शारीरिक आणि मानसिक दृष्टीने देखील तेवढ्या काटक, निरोगी, खंबीर आणि सक्षमदेखील होत्या. प्रत्येक काम निगुतीने करणे, मन लावून, एकरूप होऊन करणे, स्वतः पुढे होऊन जबाबदारी घेणे, कशाचाही कंटाळा, आळस न करणे हेच संस्कार त्या माहेरून घेऊन येत. घरातील पुरुषांकडून अथवा सासूकडून कोणत्याही मदतीची अपेक्षा ठेवणे त्यांच्या स्वप्नातदेखील नव्हतं. तरीही आहे ते आपलं म्हणून दिल्या घरी त्या सुखासमाधानाने नांदत. कितीही त्रास झाला, दमणूक झाली, मूड नसला, आजारी असल्या, कामावरून कामातील चुकांवरून बोलणी खावी लागली तरी त्या निमूटपणे सहन करत.

त्या काळी प्रचंड काम आणि कष्ट करणारी स्त्री ही आदर्श, सोशिक, सहनशील, सुसंस्कारी मानली जायची आणि घरोघरी सारखीच परिस्थिती असल्याने कोणाला त्यात काही वावगे वाटायचे नाही. परंतु आजमितीला परिस्थिती पूर्णतः बदलली आहे आणि आजच्या नवविवाहित मुली, महिलादेखील कालानुरूप पूर्ण बदललेल्या आहेत.

महिलांनी शैक्षणिक प्रगती केल्यापासून, नोकरीत व्यवसायात सामाजिक योगदानात त्या अग्रेसर झाल्यापासून अनेक सोयीसुविधा, विकतचे मनुष्यबळ त्यांना उपलब्ध असल्यामुळे आणि ते वापरण्याची



आर्थिक कुवत असल्यामुळे, स्वतः कमवती असल्यामुळे महिला कमीतकमी वेळ घरकाम, स्वयंपाक, धुणं-भांडी, झाडू, फरशी या गोष्टींना देतात अथवा हे सगळंच पगार, पैसे देऊन कोणाकडून करून घेणे याला प्राधान्य देतात. हॉटेलिंग, पार्सल सुविधा, सणवारांचे पदार्थसुद्धा आयते मिळत असल्याने आता महिलांवरील ताण बऱ्यापैकी कमी झालेला आहे. घरातील साफसफाई, घरातील विविध स्वरूपाची काम यासाठी बाजारात अनेक सेवा साधन उपलब्ध आहेत. अशा गोष्टीत वाया जाणारा वेळ आणि होणारी दमछाक यापेक्षा महिला स्वतःचं करिअर घडवणं, चार पैसे मिळवणं, स्वतःच्या मनानुसार जगणं, स्वतःच्या आवडी-निवडी तब्येत सांभाळणं, मित्रमैत्रिणींसोबत फिरायला जाणे यासारखे आयुष्य उपभोगताना दिसतात. आयुष्याचा आनंद घेण्यासाठी प्रयत्न करताना दिसतात. जशी सामाजिक परिस्थिती बदलली तसेच महिलादेखील स्वतःला बदलत गेली आहे.

घरकामावरून सासुरवास हा प्रकार आजच्या मुलींना पचवणं आणि पेलवणं कठीण होऊन बसलं आहे. सासू किंवा घरातील नात्याने, मानाने आणि वयाने मोठ्या असलेल्या महिलांनी आपल्याकडून त्याच अपेक्षा कराव्यात का ज्यात त्यांचं आयुष्य गेलं? हे स्वीकारणे आजच्या तरुण मुलींना शक्य नाही. हे जुने लोक स्वतःही बदलत नाहीत आणि आम्हांला पण मनाजोगतं जगू देत नाहीत, असा एकंदरीत समज नवीन पिढीतील महिलांचा आहे. घरकामाला बाई किंवा कामवाली न लावता सुनेकडून या कामांची अपेक्षा ठेवणे म्हणजे मुद्दाम केलेला छळ असं आजच गणित झालं आहे. उरलेसुरले पदार्थ फेकून न देता त्याचं काहीतरी बनवून खाणं आणि त्यातून कौटुंबिक शांतता भंग होत चालली आहे.

**- मीनाक्षी जगदाळे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# आयुष्मान भारत योजनेची प्रक्रिया गतीमान करा

## जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांचे आवाहन

सुराज्य/सोलापूर

**आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील गरीब, गरजू नागरिकांवर दर्जेदार व मोफत उपचार करण्यात येत आहेत. या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करून प्रक्रिया गतीमान करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी केले.**

आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राज्यात २३ सप्टेंबर २०१८ ला एकत्र करण्यात आली, यानिमित्त आयुष्मान भारत पंधरवडा राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालय येथे योजना अंमलबजावणीसाठी उत्कृष्ठ काम केलेल्या आरोग्यमित्रांचा जिल्हाधिकारी शंभरकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. रवी भोपळे, डॉ. सुजित हालींघोंगडे, नागराज गुजारे, अकिल मुजावर आदी उपस्थित होते.

गरीब, आर्थिक दुर्बल रूग्णांना आरोग्यविषयक सेवा मिळण्यासाठी केंद्र सरकारची आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व राज्य शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना या दोन्ही योजना चार वर्षांपासून एकत्रित राबविण्यात येत आहेत.



गरजू आणि गरीब नागरिकांना आरोग्याच्या सोईसुविधा मिळण्यासाठी या योजना अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहचवण्याचे काम करावे असे आवहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

जिल्ह्यात १५ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत 'आयुष्मान भारत पंधरवडा' साजरा केला जात आहे. यानिमित्ताने जिल्ह्यात दोन्ही योजनेशी संलग्नित ४८ शासकीय आणि खासगी दवाखान्यात ३० आरोग्य शिबीरे घेण्यात आली आहेत. योजनेच्या रूग्णालयांनी १२ शाळांमध्ये प्रचार, प्रसार, जनजागृतीबाबत कार्यक्रम घेतले तर २० आरोग्य शिबीरे ३० सप्टेंबरपर्यंत घेण्यात येणार आहेत. आरोग्य शिबीरात आयुष्मान कार्ड, आभा कार्डची नोंदणी करण्यात येणार आहे. आधारकार्ड, रेशनकार्ड सोबत घेऊन शिबीराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन डॉ. भोपळे यांनी केले आहे. यावेळी योजनेचे समन्वयक डॉ. रवी भोपळे, टीपीए जिल्हा प्रमुख नागराज गुजारे, आयटी सेलचे जिल्हा प्रकल्पप्रमुख रिजवान मुल्ला, सपोर्ट इंजिनीअर आशिष देशमुख, कॉमन सर्विस सेंटरचे जिल्हा प्रमुख धनंजय येवते, सोमेश भोसले आदी उपस्थित होते.



## बँक ऑफ इंडिया माळेवाडी शाखेत वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा

**सोलापूर** : माळशिरस तालुक्यातील माळेवाडी (अ) येथील बॅक ऑफ इंडिया ११७ वा वर्धापन दिन विविध कार्यक्रमाचे आयोजन करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महालींगेश्वर शाळेचे मुख्याध्यापक प्रविणकुमार स्वामी उपस्थित होते.या वेळी महिला बचत गटांच्या महिला वर्गांची विशेष उपस्थिती होती.या कार्यक्रमामध्ये कर्जदाराला मंजुरी प्रमाण पत्र देण्यात आली.या प्रसंगी ४२ लाख रूपयांचे कर्जाचे वितरण करण्यात आले.यामध्ये व्यावसायीकांना,महिला बचत गटांना, नवीन वाहन खरेदीसाठी तसेच विविध योजनांचे कर्ज वितरण करण्यात आले. यावेळी बोलताना प्रमुख पाहुणे स्वामी सर म्हणाले कि, बॅक ऑफ इंडिया शाखेच्या सेवेबदल समाधान व्यक्त करून बॅकेने गोरगरीब लोकांना,तरूण व सुशिक्षित युवकांना कर्ज वितरण करून रोजगार उपलब्ध करून दिला असून त्यांना स्ववलंबी बनविले आहे. यावेळेस शाखा व्यवस्थापक विश्वास मुलगीर, नितीन फासे, रवी तेजा, स्वप्निल कच्छवाय ठाकूर, सुरज माने, भुषण नेर्लेकर, कल्याण राज व अन्य कर्मचारी उपस्थित होते.



## कट्टीमनी यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण

**सोलापूर** : कै. हणमंतराव ईरप्पा कट्टीमनी (गुरुजी) यांच्या स्मरणार्थ समर्थ नगर येथे अंगणवाडी शाळा,जिल्हा परिषद शाळा व शक्ती देवी मंदिर येथे वृक्षारोपण करून संरक्षण जाळी बसवण्यात आले. या प्रसंगी समर्थ नगर चे माजी सरपंच शिवशंकर चनशेट्टी, माजी सरपंच आनंद खजुर्गी, प्राध्यापक तळेकर, फोटोग्राफर मोरे, ग्रामसेवक मारुती सुरवसे, उदय नरेगल, ग्रा.पं.कर्मचारी सचिन गिरबोने व मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी यांच्या प्रमुख उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले.

## प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेवर मार्गदर्शन शिबिर

**सोलापूर** : प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक नुकतेच जाहीर झाले आहे. यामध्ये रजिस्ट्रेशन, व्हेरिफिकेशन व कन्फरमेशन कशा पद्धतीने करायचे ? यासंदर्भात पालक व विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी एन. के. ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्यावतीने २४ सप्टेंबर २०२२ रोजी रंगभवन येथे सायंकाळी ६ वाजता मार्गदर्शन शिबिर आयोजित केले आहे. यंदा कॅप राऊंडच्या तीन फेऱ्या होणार आहे. तसेच या ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रियेमध्ये यावर्षीच्या नवीन नियमातील बदलांबाबत सविस्तर मार्गदर्शन व शंका निरसन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. दफेदार हे करणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन नोंदणी २१ सप्टेंबर २०२२ पासून सुरू झाली असून ते ४ ऑक्टोबर २०२२ पर्यंत चालणार आहे. सुविधा केंद्रामार्फत यंदाच्या वर्षीसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन समुपदेशन तसेच विद्यार्थ्यांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी केली जाणार आहे. तरी या मार्गदर्शन शिबिरासाठी बारावी उत्तीर्ण सर्व विद्यार्थी व पालक यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे प्रमुख प्रा. संतोष जाधव यांनी केले आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात मतदान कार्डाशी आधार जोडणी शिबीर

**सोलापूर** : मतदान कार्डाला आधार जोडणी करण्याची मोहीम जिल्हाभर सुरू आहे. आज जिल्हाधिकारी कार्यालय आणि अधिनस्त कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची बहुउद्देशीय सभागृहात एकदिवशीय शिबिराद्वारे सुमारे २%० मतदान कार्डाची आधार जोडणी करण्यात आली. नागरिकांनी मतदान कार्डाशी आधार जोडणी करून घेण्याचे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी भारत वाघमारे यांनी केले आहे. शिबिरामध्ये शासकीय अधिकारी, कर्मचारी, त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची आधार जोडणी करण्यात आली. नागरिकांसाठी आधार जोडणी प्रक्रिया स्थानिक गावचे बीएलओ, तहसील कार्यालय येथे उपलब्ध आहे. शिवाय स्वत: मोबाईलद्वारे पीीी पोर्टल किंवा व्होटर हेल्पलाईन पद्वारेही आधार जोडणी करू शकतो. मतदान कार्ड आधारशी जोडणी करून घेण्यासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही. नागरिकांनी आधार जोडणी करून घेण्याचे आवाहन निवडणूक तहसीलदार अमरदीप वाकडे यांनी केले आहे. यावेळी नायब तहसीलदार अनिल निराळी, कर्मचारी उपस्थित होते.

## अकलूज, बार्शी, पंढरपूर व करमाळा येथे होणार दिव्यांगांसाठी तपासणी शिबीर

**सोलापूर** : राज्य शासनाकडून १४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२२ या कालावधीमध्ये राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने अकलूज, पंढरपूर, करमाळा व बार्शी परिसरातील ज्या दिव्यांग व्यक्तींनी दिव्यांग प्रमाणपत्र मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज केले होते, त्यांच्या कागदपत्रांची तपासणी करण्याबाबत शिबीर आयोजित केल्याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांनी दिली. बार्शी ग्रामीण रुग्णालयात २२, २४, २८ आणि २९ सप्टेंबर, करमाळा येथे २३, २३, ३० सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर, पंढरपूर येथे २२, २७, २९ सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर, आणि अकलूज उपजिल्हा रूग्णालयात २३, २४, २८ आणि ३० सप्टेंबर २०२२ रोजी ज्या दिव्यांग व्यक्तींनी ऑनलाईन अर्ज केले आहेत, त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यात येणार आहे. दिलेल्या चार ठिकाणी फक्त अस्थिव्यंग दिव्यांगांची कागदपत्रे पडताळणी व तपासणी केली जाणार आहे. हे शिबीर अकलूज येथे वैद्यकिय अधीक्षक डॉ. महेश गुडे, बार्शी येथे वैद्यकिय अधीक्षक डॉ. सचिन कदम, पंढरपूर येथे वैद्यकिय अधीक्षक डॉ. महेश माने, करमाळा येथे वैद्यकिय अधीक्षक डॉ. अमोल डुकरे यांच्या देखरेखीखाली पार पडत आहे. शिबीरामध्ये अस्थिरोग तज्ञ डॉ. निखील मिसाळ, अकलूज आणि डॉ. भोसले, करमाळा हे काम पाहणार आहेत. जास्तीत जास्त दिव्यांगांनी विशेष मोहिमेचा लाभ घेण्याचे आवाहन डॉ. ढेले यांनी केले आहे.

## बँकिंग धोरणाबाबत आर्थिक साक्षरता निर्माण व्हावी

### - कॉ. देविदास तुळजापूरकर यांचे प्रतिपादन
### - सोलापूर विद्यापीठात कॉ. प्रभाकर यादव व्याख्यानमाला

सुराज्य/सोलापूर

भारतातील बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले असून त्याचे मालक शासन आहे. राष्ट्रीयकृत बँकांनी गर्भश्रीमंत लोकांनाच मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा केला असून त्यांच्याकडील थकित कर्जाची आकडेवारीदेखील मोठी आहे. सामान्यांसाठी बँकांचे धोरण मात्र विकृतीचे आहे. त्यामुळे बँकिंग धोरणाबाबत आर्थिक साक्षरता निर्माण व्हावी आणि सर्वसामान्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, असे प्रतिपादन बँक युनियन चळवळीचे अभ्यासक कॉम्रेड देविदास तुळजापूरकर यांनी केले.




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉइज युनियन, औरंगाबाद यांच्या सहकार्याने कॉम्रेड प्रभाकर यादव व्याख्यानमालेअंतर्गत कॉ. तुळजापूरकर यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी ते 'बँकांचे लोकशाहीकरण' या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस होत्या. व्यासपीठावर कुलसचिव योगिनी घारे आणि बँक ऑफ महाराष्ट्र युनियनचे सरचिटणीस धनंजय कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.कॉ. तुळजापूरकर म्हणाले, जनधन योजनेमुळे ५० कोटी नवीन खाती उघडण्यात आली. सर्वसामान्य ग्राहक बँकांशी जोडला गेला. आज देखील देशातील २५ ते २७ टक्के लोकांपर्यंत बँकिंग सेवा पोहोचली नाही. तंत्रज्ञानामुळे फार मोठा बदल बँकिंगच्या क्षेत्रात झाला असून त्याचा लाभ देखील होत आहे. मात्र सामान्य जनतेला दिलेली कर्जाची टक्केवारी अतिशय कमी आहे. मोठ्या लोकांना कर्ज देण्याची स्पर्धा आहे. एक प्रकारची ही विकृती आहे. या विकृतीकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. प्रास्ताविक प्र-कलगुरू डॉ. राजेश गादेवार यांनी केले. सूत्रसंचालन श्रुती देवळे यांनी केले. आभार सहायक कुलसचिव अनिल जाधव यांनी मानले.

## २६ सप्टेंबरपासून सिध्देश्वर बँकेचा शारदीय महोत्सव

सुराज्य/सोलापूर

सिध्देश्वर बँक सेवक सांस्कृतिक मंडळ सोलापूर यांच्यावतीने सोमवार दिनांक २६ रोजी शारदा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती सिध्देश्वर बँकेचे व्हाईस चेअरमन नरेंद्र गंभीरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

सोमवारी दिनांक २६ रोजी राजू काजे पुणे प्रस्तुत गाता रहे मेरा दिल या मराठी आणि हिंदी गीतांचा अनमोल रचना नजराणा होणार आहे तसेच मंगळवार दिनांक २७ रोजी मिलिंद जोशी पुणे कार्याध्यक्ष महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांचे प्रश्नाला उत्तर असतेच या विषयावर व्याख्यान होणार आहे तसेच बुधवार दिनांक २८ रोजी सुशील कुलकर्णी पत्रकार ऑनलाइन चैनल विषय आहे माध्यमांचा रिमोट आपल्यासाठी यावर व्याख्यान होणार आहे तसेच गुरुवार दिनांक २९ रोजी इंद्रजीत भालेराव जेष्ठ कवी यांचे माझा गाव माझे माणसं या विषयावर व्याख्यान होणार आहे. शुक्रवार दिनांक २३ रोजी डॉक्टर शिवरत्न शेटे यांचे निरोगी जीवनाचा मंत्र यावर व्याख्यान होणार आहे तसेच सदर हे सर्व होणारे कार्यक्रम हुतात्मा स्मृती मंदिर येथे दररोज सायंकाळी साडेसहा वाजता होणार आहे अशी माहिती गंभीरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. तसेच बँके विषयी बोलताना गंभीरे म्हणाले की बँकेला बँकेचे आजवर नवीन वस्तूचा वेग व गुरुकर्व योजना अल्प व मध्यम उत्पन्न धारकांसाठी सहज परवडणारी योजना तसेच सोन्याची संधी गोल्ड लोन फक्त आठ टक्के दराने तसेच व्यावसायिक वैयक्तिक कारणांसाठी पाच लाख ते तीन कोटीपर्यंत कर्ज उपलब्ध आधी योजना बँकेतर्फे सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



## शहरातील समस्या आणि विकास कामांबाबत सकारात्मक चर्चा

### मनपा अधिकारी आणि वेक अप सोलापूर फौंडेशनचा उपक्रम

सुराज्य/सोलापूर

शहरातील प्रमुख विकास कामे आणि समस्यांवर महापालिकेचे अधिकारी आणि वेक अप सोलापूर फौंडेशनच्या पदाधिकाऱ्यांची शुक्रवारी सकारात्मक चर्चा झाली. यावेळी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून प्रश्न सोडवण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद मिळाला असल्याची माहिती वेक अप सोलापूर फौंडेशनचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी दिली.

महापालिकेचे नगर अभियंता संदीप कारंजे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत ऑक्टोबर पासुन शहराला २ दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचे नियोजन सुरू, शहरातुन जाणाऱ्या बाह्य वळण रस्त्याबाबत शासनाने मान्यता दिल्यास सी. एन. एस. हॉस्पिटल ते सोरेगाव व छ. संभाजी महाराज चौक ते सी. एन. एस. हॉस्पिटल या रस्त्यांच्या अडथळ्यांसाठी ५४ कोटी रुपयांच्या कर्जाचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे. याचे काम तत्काळ मार्गी लागेल. रस्तांवरील डबल डिव्हायडर काढुन सिंगल डिव्हायडर करण्यात यावे. सगळ्या लाईट पोलला रेडियम रिफ्लेक्टर लावण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. शहरातील गुंठेवारीची परवानगी न देता ज्या सोसायटीमधील अंतर्गत सोसायटी मधील रस्ते, पाईप लाईन, ड्रेनेज लाईन, स्ट्रिट लाईट या सुधारणा हव्या असतील तर त्यांना नगर अभियंता कार्यालयात लेखी स्वरूपात अर्ज दाखल करावे, अशा विविध विषयांवर या बैठकीत चर्चा झाली.

या बैठकीस वेक अप सोलापूर फौंडेशनचे अध्यक्ष मिलिंद भोसले, नरेंद्र भोसले, सुहास भोसले, आनंद पाटील, कैलास लांडे, इक्बाल हुंडेकरी, जावेद अत्तार आदी सदस्य उपस्थित होते.

## महापालिका परिवहन उपक्रमाचे ऑडिट सुरू; पाच जणांचे पथक शहरात दाखल

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिकेच्या परिवहन विभागाचे २०१७ ते २०१८ पासूनचे ऑडिट करण्यासाठी पाच जणांचे पथक सोलापुरात दाखल झाले आहे, अशी माहिती पालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी दिली.

सोलापूर महापालिकेच्या परिवहन विभागाचे गेल्या चार ते पाच वर्षांपासून ऑडिट नसल्याची बाब आयुक्तांना निदर्शनास आली होती. त्यानंतर हे ऑडिट सुरू करण्याचा निर्णय आयुक्तांनी घेतला आहे यामध्ये परिवहन विभागातील सर्व दप्तर इतर जमाखर्चाचा हिशोब यासह विविध विभागांचे ऑडिट होणार आहे. आमदनी अठन्नी और खर्चा रुपय्या. अशा परिस्थितीत अडकलेल्या



सोलापूर महापालिकेच्या परिवहन उपक्रमाचा खर्च कमी करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. महापालिका प्रशासनाने गेल्या दोन वर्षात कामचुकार, बेशिस्त कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. आतापर्यंत दीर्घकाळ गैरहजर असणाऱ्या २१ कर्मचाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून तोट्यात असलेल्या महापालिकेतील परिवहन उपक्रमाला उर्जितावस्था देण्यासाठी प्रशासनाकडून आटोकाट प्रयत्न करण्यात आले आहेत. वरचेवर विविध कारणास्तव मनपा बस सेवा ही तोट्यातच चालत असून परिवहन उपक्रम पुरता डबघाईला आला आहे.

दरम्यान या उपक्रमात डिझेल घोटाळा यासह विविध अनियमितता असल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे काही जणांवर कारवाईचा बडगाही उचलण्यात आला आहे. या ऑडिट नंतर आता त्या उपक्रमाचे आर्थिक पोस्टमार्टम होणार आहे.

## डॉ.कांबळेंची पशुचिकीत्सक अधिकारी पदावर नियुक्ती

सुराज्य/सोलापूर

शहरातील जुळे सोलापूर परिसरातील कृष्णा कांलनी येतील प्रसिध्द सुमेध पेट क्लिनकचे संचालक तता सेवानिवृत्त पशूधन विकास अधिकारी डां.बबनराव भानूदास कांबळे यांची मुख्यमंत्री पशुस्वास्थ योजनेंतर्गत माढा येते पशुचिकित्सा फिरत्या पतकात पशुचिकित्सक अधिकारी म्हणून नियुक्तती करण्यात आली आहे.

राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंह यांनी डां. कांबळे यांना नियुक्तीचे पत्र दिले. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डां. नाना सोनवणे यांनी त्यांना नियुक्त करून घेतले. राज्य शासनाच्या पशू संवर्धन विभागाकडे २५ - ३० वर्षे प्रदीर्घ काळ सेवा झालेल्या डां. कांबळे यांचे पशुधन क्षेतात मोलाचे योगदान आहे. त्यांच्या या योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार देवून गोरविण्यात आलेले आहे.



डां.कांबळे त्यांनी गडचिरोली आणि जत( सांगली) येते पशु संवर्धन अधिकारी तसेच दक्षिण सोलापूर तालुका पशुधन विकास अधिकारी या पदावर काम केले आहे. मुख्यमंत्री पशुस्वास्त योजनेंतर्ग फिरत्या पतकात पशु चिकित्सक अधिकारी म्हणून रूजू होणारे कांबळे हे महाराष्ट्रातील पहिले पशुचिकीत्सक डांक्टर ठरले आहेत. डॉ.कांबळे यांच्या निवडीबद्दल समाजामधील सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## जि.प.वर भाजपाचा झेंडा फडकवा : आ.कल्याणशेट्टी

सुराज्य/मोहोळ

भाजपमध्ये प्रामाणीकपणे काम केलेल्या कार्यकत्यांची दखल वरीष्ठ देखील घेतात. त्यांना न्याय दिला जातो. त्यामुळे अंग झटकून काम करा. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समीतीवर झेंडा फडकवा असे आवाहन भाजपाचे नूतन जिल्हाध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी केले कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी तालुकाध्यक्ष सुनिल चव्हाण हे होते.

ते पुढे म्हणाले, मोहोळ तालुका हा लढवय्या कार्यकत्यांचा आहे. आपल्याला देशासाठी नरेंद्र मोदी आणि राज्यासाठी देवेंद्र फडणवीस असे स्वाभीमानी कणखर असा नेते मिळाले आहेत. त्यांच्या वाढदिवसा निमित्य सेवा पंधरवाडा जसा मोठ्या उत्साहाने केला तसा संघटनात्मक कामासाठी वेळ द्या. यापुढे तालुक्यात शत प्रतिशत भाजपा असेल यासाठी प्रयत्न करा. किसान मोर्च्याचे प्रदेशउपाध्यक्ष तथा माजी जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघमारे म्हणाले, लोकसभा निवडणुकीत भाजपाला चांगली मते पडतात.यंदा विधानसभा निवडणूकीत भरघोस मतांनी भाजपाचा आमदार पाठवू. या वेळी माजी पालकमंत्री प्रा.लक्ष्मणराव ढोबळे, जि.प.चे




माजी सभापती विजयराज डोंगरे यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी लोकसेवक संजय क्षीरसागर, शहराध्यक्ष सुशील क्षीरसागर, सुनिल चव्हाण, बाळासाहेब पाटील, सतीश काळे औदूंबर वाघमोडे संजय वाघमोडे, तालुका सरचिटणीस महेश सोवनी, रमेश माने, सतीश पाटील, मुजीब मुजावर, दिलीप गायकवाड, नागेश क्षिरसागर अविनाश पांढरे, फंटू गोफणे, दिलीप कदम, रंगनाथ गुरव, गणेश झाडे,महेश राऊत, मच्छिंद्र गाडे श्रीकांत लांडगे, जगन्नाथ वसेकर, अमोल चोरगे प्रकाश काळे, बाबासाहेब जाधव आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## जीवनाची हमी बालमृत्यू कमी उपक्रमाची राज्यस्तरावर दखल

### प्रधान सचिवांकडून सीईओ स्वामी यांचे अभिनंदन

**सोलापूर** : सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी स्वामी राबवित असलेल्या 'जी-वनाची हमी बालमृत्यू कमी' या मोहिमेचे कौतुक राज्याचे आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. प्रदीप व्यास व आरोग्य विभागाचे आयुक्त रामास्वामी यांनी केले आहे. या उपक्रमाचे अभिनंदन करून बालमृत्यु कमी करण्यासाठी महत्वाचे अभियान असल्याचे सांगितले.

आरोग्य विभागाच्यावतीने आज बालमृत्यू व उपजतमृत्यू याबाबत व्हीसीचे आयोजन करण्यात आले होते. राज्यातील सर्व जिल्हा परिषदेचे सीईओ व जिल्हा आरोग्य अधिकारी या व्हीसीला उपस्थित होते. सोलापूर जिल्हा परिषदेचे सीईओ स्वामी यांनी बालमृत्यु कमी जीवनाची हमी या अभियानाचे प्रभावीपणे सादरीकरण केले. समाजामध्ये आरोग्यविषयक ज्या अनेक समस्या आहेत. त्यात बालमृत्यू व उपजतमृत्यू ही एक मोठी समस्या आहे. बालमृत्यू व उपजतमृत्यू कमी करण्यासाठी आरोग्य विभाग व महिला बालकल्याण विभागाच्या समन्वयातून जीवनाची हमी बालमृत्यू कमी या महत्वाकांक्षी उपक्रमाची सोलापूर जिल्ह्यात सुरूवात करण्यात आली.



## मराठवाडा 'स्वररत्न' पुरस्काराने विश्वास शाहीवाले सन्मानित

सुराज्य/सोलापूर : शिवरंजनी समूहाचे संस्थापक व प्रसिद्ध गायक विश्वास शाहीवाले यांना 'मराठवाडा स्वररत्न ' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कोथरूड (पुणे) येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्रसिद्ध शास्त्रीय गायक, संगीतकार रवींद्र गांगुर्डे, पंडित सुहास व्यास, किशोर सरपोतदार आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

प्रसिद्ध गायक विश्वास शाहीवाले हे मूळचे उस्मानाबाद जिल्ह्यातील गुंजोटी या गावचे रहिवासी आहेत. मात्र गेल्या अनेक वर्षापासून ते सोलापूर मध्ये व्यवसायानिमित्त स्थायिक झाले आहेत. त्यांनी संगीताचे शिक्षण किराणा घराण्याचे प्रख्यात गायक पंडित प्रभूदेव सरदार यांच्याकडे घेतले आहे. सोलापुरातील प्रसिद्ध शिवरंजनी या कार्यक्रमाचे ते मुख्य सूत्रधार असून उन्मेष शहाणे, शैलेश मोहोळकर, माधव देशपांडे, मिलिंद गोरटे, नागेश शेंडगे, समीर रणदिवे आधी कलावंताच्या मदतीने त्यांनी शिवरंजनीची स्थापना करत मराठमोळा वाद्यवृंद प्रेक्षकांच्या भेटीला आणला आहे. या वाद्यवृंदाचे सोलापूरसह महाराष्ट्र ,गोवा व विदेशातही मोठ्या प्रमाणात संगीतरजनी कार्यक्रम झाले आहेत. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष दिनकर चौधरी यांनी केले. आभार मनोज पवार यांनी मानले.

**शिवरंजनीचे उमटले सूर**


या कार्यक्रमाच्या निमित्ताने शिवरंजनी संगीत समूहाचा अमर लता कार्यक्रम देखील कार्यक्रमस्थळी सादर करण्यात आला. या सांगितिक कार्यक्रमात लता मंगेशकर यांच्या गीतांचे सादरीकरणाला रसिकांनी मोठा प्रतिसाद दिला.

## रोजगार मेळाव्यात १३७ जणांची निवड

सुराज्य/सोलापूर : कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, सोलापूर आणि साई समर्थ विद्या विकास संस्था व अहिल्याबाई प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडीत दीनदयाल उपाध्याय (अल्पसंख्याक विशेष) रोजगार मेळाव्यात १३७ उमेदवारांना रोजगार मिळाल्याची माहिती सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता कार्यालयाने दिली आहे.

मेळाव्यासाठी औद्योगिक परिसरातील एकूण १० नामांकित उद्योजकांनी ४०० पेक्षा जास्त रिक्तपदासाठी सहभाग नोंदविलेला होता. रिक्तपदे किमान १० वी, १२ वी, पदवीधर, आयटीआय, डिप्लोमा, इंजिनिअरिंग, जीएनएम, बी.एस.सी, स्टाप नर्स, बी.फार्म, एम.फार्म, एम.बी.ए. केमिस्ट इत्यादी विविध पात्रताधारक उमेदवारांसाठी होती. जिल्ह्यातील जास्तीत जास्त नोकरी इच्छुक उमेदवारांना या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून नोकरीच्या विविध संधी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या होत्या. रोजगार मेळाव्यात ३०९ नोकरी इच्छुक उमेदवारांनी सहभाग नोंदविला. त्यामधून एकूण १० उद्योजकांमार्फत प्रत्यक्ष मुलाखतींद्वारे १३७ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली आहे.

## लिंबूचे दर भिडले गगनाला



कृषी उत्पन्न बाजार समितीकडून शुक्रवार, २३ सप्टेंबर रोजी मिळालेल्या माहितीनुसार लिंबूचे दर प्रतिक्किंटल हजार रूपये वरून अडची हजार रूपयांची वाढ होत साडेपाच हजार रूपये प्रतिक्किंटल दरवाढ होत लिंबूचे दर गगनाला भिडले आहेत. त्याचबरोबर कारली, वांगी, कोबी, ढोवळी मिरची, गाजर, गवार, कोथिंबीर, फ्लॉवर, चाकवत, हिरवी मिरची, मेथी भाजी, बटाटा, पालक आदींच्या किंमतींमध्ये प्रतिक्किंटल ५०० ते हजार रूपयेने वाढ झाली आहे.

### सोलापूर बाजारभाव

| शेतमाल | कमीत कमी दर (क्विं. ) | जास्तीत जास्त दर (क्विं. ) | सर्वसाधारण दर |
|---|---|---|---|
| सफरचंद | ३,००० | ६,५०० | ३,००० |
| कारली | २,५०० | ४,००० | ३,००० |
| वांगी | १,५०० | ५,५०० | ३,००० |
| कोबी | ५०० | १,३०० | १,००० |
| ढोवळी मिरची | १,५०० | २,६०० | २,००० |
| गाजर | १,५०० | ३,२०० | २,००० |
| गवार | २,५०० | ७,००० | ४,००० |
| कोथिंबीर | ८०० | ३,००० | २,००० |
| काकडी | २,००० | ६,००० | ३,००० |
| फ्लॉवर | ८०० | १,४४० | १,०४० |
| लसूण | १,००० | २,६०० | १,४०० |
| घेवडा | ३,५०० | ५,५०० | ४,५०० |
| हिरवी मिरची | २,००० | ४,००० | ३,००० |
| अंबाडी भाजी | ५०० | ५०० | ५०० |
| कांदा पात | ५०० | ८०० | ७०० |
| बटाटा | ७५० | २,५०० | १,८०० |
| लिंबू | १,००० | ७,५०० | ५,५०० |
| तांदूळ | २,९९० | ६,२८५ | ३,७५० |
| दोडका | १,००० | ४,००० | २,५०० |
| शेपू | ६०० | ९०० | ७०० |
| ज्वारी | २,४०० | ३,१०० | २,८१५ |
| सोयाबिन | ४,८०० | ५,१०० | ४,९०० |
| पालक | ८०० | १,३०० | १,००० |
| टोमॅटो | ३०० | २,००० | १,००० |
| गहू | २,२९५ | ३,२४५ | २,७४० |

# कीर्तनबंदीचा निर्णय अंगलट आला

## ■ कार्यकारी अधिकाऱ्यांनी फोडला गोपनीय अहवाल

सुराज्य/पंढरपूर

**भजन आणि कीर्तन बंदीचा निर्णय अंगलट आल्यामुळे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी गजानन गुरव यांनी राज्य गुप्तवार्ता विभागाचा गोपनीय अहवाल फोडला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल राज्य गुप्तवार्ता विभागाने घेतली असून त्यांच्या पथकाने मंदिराची पाहणी केली.**



श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या सभामंडपात भजन आणि कीर्तन करण्यास बंदी घालण्यात आली होती. राज्यात हिंदुत्ववादी सरकार असताना वारकऱ्यांना अवमानकारक वागणूक मंदिर समितीकडून देण्यात होत आहे. हिंदुत्ववादी संघटनांनी कडाडून विरोध केल्यामुळे बंदीचा निर्णय कार्यकारी अधिकारी गजानन गुरव यांनी मागे घेतला.

भजन कीर्तन बंदीचा निर्णय राज्य गुप्तवार्ता विभाग, आय बी, यांनी गोपनीय अहवालावरून केल्याचा खळबळजनक खुलासा कार्यकारी अधिकारी गजानन गुरव यांनी केला. गोपनीय अहवालातील सुरक्षेच्या बाबी कार्यकारी अधिकारी गजानन गुरव यांनी मीडिया समोर सांगितल्यामुळे गोपनीयतेचा भंग केला आहे.

गोपनीय बाबी उघड केल्यामुळे राज्य गुप्तवार्ताने याची गंभीर दखल घेतली असून दोन दिवसांपूर्वी राज्य गुप्तवार्ता विभागाच्या पथकाने मंदिराची पाहणी केली आहे.



या सर्व प्रकारच्या वस्तुनिष्ठ अहवाल वरिष्ठांना पाठवला आहे.

> राज्य गुप्तवार्ता विभागाने २०१८ ला गोपनीय अहवाल दिला, तो गोपनीय अहवाल आहे, त्यामध्ये विठ्ठल रुक्मिणी मंदिरात कार्यक्रम घेण्यात येऊ नये. त्यांच्या सुचनेनुसार मंदिर समितीने २०१९ पुढील निर्णय होईपर्यंत कार्यक्रम घेऊ द्यावेत, मात्र स्पीकरला परवानगी देऊ नये.
>
> **- गजानन गुरव, कार्यकारी अधिकारी.**

> कार्यकारी अधिकारी गुरव यांच्या हे प्रकरण अंगलट आल्यामुळे त्यांनी गुप्तवार्ता विभागाच्या माथी मारले आहे. एक सत्य लपवण्यासाठी १०० खोटे बोलावे लागत आहे. कार्यकारी अधिकारी आणि मंदिर समितीने माफी मागावी.
>
> **- रामकृष्ण वीर महाराज.**

## बालमृत्यू, मातामृत्यू रोखण्यासाठी बालविवाह निर्मूलन महत्वाचे : स्वामी

सुराज्य/सोलापूर

'बालमृत्यू आणि मातामृत्यू ही मोठी समस्या असून या समस्येचे प्रमुख कारण बालविवाह आहे. बालवयात लग्न झालेल्या मुलींचे गर्भाशय विकसित झालेले नसल्याने तीच्या पोटी जन्माला येणाऱ्या बाळाचा मृत्यू होण्याची शक्यता जास्त असते, असे सीईओ दिलीप स्वामी यांनी सांगितले.

सोलापूर प्राथमिक शिक्षण विभाग व युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात बालविवाह निर्मूलन प्रशिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, याप्रसंगी सीईओ स्वामी बोलत होते.

सीईओ स्वामी पुढे म्हणाले की, सोलापूर जिल्हा परिषदेने या अगोदरच 'जीवनाची हमी बालमृत्यू कमी' हे अभियान सुरू केले आहे. सध्या सोलापूर जिल्ह्यात या अभियानाचे चांगले काम सुरू आहे. तसेच नुकतेच दोन दिवसांपूर्वी महाराष्ट्र शासनाने 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' हे अभियान जाहीर केले आहे.



कोविड काळातही सोलापूर जिल्हा परिषदेने 'माझे मूल, माझी जबाबदारी' या उपक्रमाची अंमलबजावणी करून कित्येक दुर्धर आजाराने ग्रस्त मुलांचा शोध घेतला व योग्य वेळी त्यांच्यावर उपचार करून त्या बालकांना जिवदान दिले आहे. त्याचप्रमाणे सोलापूर जिल्हा परिषदेचा 'सायकल बँक' उपक्रमही बालविवाह निर्मूलनामध्ये उपयोगी ठरत आहे. केवळ सायकल नसल्यामुळे मुलींचे शाळा सोडण्याचे प्रमाण वाढत चालले होते. मुलींनी शाळा सोडल्यानंतर त्यामधील काहींचे बालविवाह झाल्याची धक्कादायक माहिती समजली. हे थांबविण्यासाठी लोकसहभागातून मुलींसाठी जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत सायकल बँक स्थापन करण्यात आली. आजपर्यंत सुमारे तीन हजार सायकली लोकसहभागातून जमा झाल्या असून तीन हजार मुली शिक्षणाकडे पुन्हा वळल्या आहेत.

या सर्व अभियानाच्या पार्श्वभूमीवर बालविवाह निर्मूलन प्रशिक्षण युनिसेफ व प्राथमिक शिक्षण विभागाने आयोजित केले.

### निविदा मंजूर तरीही

## ठाकरे चौक ते गोदूताई परुळेकर नगर कुंभारी रस्त्याचे काम रखडले

सुराज्य/सोलापूर

**निविदा मंजूर होऊनही रखडलेले ठाकरे चौक ते गोदूताई परुळेकर नगर कुंभारी रस्त्याचे तात्काळ सुरु करावे, अशी मागणी संभाजी आरमारने जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.**

सोलापूर शहर हद्दीतील जुना कुंभारी मार्गावर ठाकरे चौक ते गोदूताई परुळेकर नगर कुंभारी हा रस्ता अतिशय खड्डेमय झाला आहे. याबाबत नागरिकांमधून सातत्याने ओरड होत असून जीवेघेणा प्रवास करावा लागत आहे. वारंवार अपघात घडत असून लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. विशेष म्हणजे या रस्त्याच्या कामाची निविदा प्रक्रिया देखील झालेली आहे. मात्र प्रत्यक्षात काम कधी सुरु होणार हे समजत नाही. गोदूताई परुळेकर नगर आणि परिसरात दाट लोकवस्ती आहे. हजारो लोकांची रोज या रस्त्यावरून ये-जा होत असते. वारंवार निवेदने, आंदोलने, मागणी करून देखील हजारो लोकांना रस्त्यामुळे भोगावा लागणार त्रास काही केल्या कमी होत नाही. तरी निविदेप्रमाणे तात्काळ या कामाची सुरुवात होऊन रस्त्याचे काम पूर्ण व्हावे. जेणेकरून त्या परिसरातील लोकांचा प्रवास निर्धोक आणि सुरक्षित होण्यास मदत होईल.

याप्रकरणी तात्काळ कार्यवाही न झाल्यास संभाजी आरमारला जनहितार्थ आंदोलन करावे लागेल असा इशारा शिवाजी वाघमोडे, सागर दासी, लक्ष्मण बोल्ली, महेश येमूल, नरेश अडकी , नामदेव बोड्डू, जितेश चिनी, राजू आखाडे,राजू रच्चा, नवनाथ मस्के आदींनी दिला आहे.

## जास्तीत जास्त निधी आणून कुमठे गावाचा विकास करू : दिलीप माने

### कुमठे गावातील ८४ लाखांच्या रस्त्याच्या कामांचा शुभारंभ

सुराज्य/सोलापूर

**महापालिकेच्या विशेष अनुदानातून कुमठे गावातील जय हिंद चौक ते रेल्वे गेट पर्यंतच्या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ होत आहे. कुमठे गावाचा विकास करण्यासाठी माने कुटुंबीय कायम प्रयत्नशील होते आणि राहणारच. यापुढेही जास्तीत जास्त निधी आणून आपण गावाचा विकास करू, असे प्रतिपादन माजी आमदार दिलीप माने यांनी केले.**



कुमठे गावातील जय हिंद चौक ते रेल्वे गेट पर्यंतच्या ८४ लाखाच्या रस्त्याच्या कामांचा शुभारंभ माजी आमदार दिलीप माने यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला माजी नगरसेवक जयकुमार माने, बाळासाहेब माने, चंद्रकांत लिंबीतोटे आदींची प्रमुख उपस्थिती होती. दिलीप माने पुढे म्हणाले की, 'मध्यंतरी आम्ही शहरातील रस्ते व्हावेत म्हणून आंदोलन केले होते. आमच्या सर्व मागण्या मान्य आल्या आहेत. जय हिंद चौक ते कुमटे रेल्वे गेट या रस्त्याचे काम राहिले होते. आज या कामात सुरुवात झाली आहे. माजी नगरसेवक जयकुमार माने म्हणाले की, 'आपल्या कार्यकाळात सर्वाधिक निधी कुमठे गावात आणून विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. यापुढेही आपण महापालिकेच्या माध्यमातून प्रभागाचा विकास करण्यास प्रयत्नशील राहू.'

या कार्यक्रमाला नारायण भोपळे, सुभाष अवताडे, कृष्णात व्हरडे, महादेव अवताडे, गुरुसिद्ध कस्तुरे, दत्ताआबा गरड, विठ्ठल मोरे, लक्ष्मण शास्त्री, हाजी शेख, महादेव कोळी, रसूल शेख, आप्पा भद्रशेट्टी, जिलानी शेख, शावरप्पा वाघमारे, चंद्रकांत फुलमाळी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



## श्रीनाथ विद्यालयात डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील जयंती साजरी

सुराज्य/वेळापूर

**विद्यार्थ्यांना स्वावलंबन शिक्षणाचा मूलमंत्र देत समाजातील बहुजनांपर्यंत ज्ञानाची गंगा नेण्याचे महान कार्य करणाऱ्या थोर शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३५ वी जयंती गुरुवार दि.२२ सप्टेंबर २०२२ रोजी श्रीनाथ विद्यालय, बोरगाव येथे बोरगाव गावातून भव्य मिरवणूक काढून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.**

मिरवणुकिच्या सुरुवातीला स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन राजकुमार पाटील, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा कुमुदिनी पाटील यांनी कर्मवीर अण्णाच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

याप्रसंगी पृथ्वीराज राजकुमार पाटील, डॉ. रमेश बिडवे, प्राचार्य कांबळे के. टी. यांनीही पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. या मिरवणुकित विद्यालयाच्या लेझीम पथक, झांज पथक, टिपरी पथकातील विद्यार्थ्यांनी गावामध्ये ठिकठिकाणी लक्षवेधी प्रात्यक्षिके सादर करून बोरगाव वासियांची मने जिंकली.

बोरगाव गावातून मिरवणूक मार्गस्थ होताना ठिकठिकाणी ग्रामस्थांनी कर्मवीर अण्णाच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. शेवटी ग्रामपंचायत बोरगावच्या पटांगणावर लेझीम, झांज, टिपरी पथकांनी आपली प्रात्यक्षिके ग्रामस्थांच्यापुढे सादर केली .

ही मिरवणूक शिस्तबध्द पध्दतीने पार पाडण्यासाठी मुख्याध्यापक कांबळे के. टी. यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक बंधू व भगिनींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विकास नलवडे यांनी केले.

## जिल्हा प्राथ. शिक्षक पतसंस्थेची उद्या सर्वसाधारण सभा

सुराज्य/सोलापूर

कै. प्रभुजी पाटलोजी नाईक नवरे गुरुजी यांनी स्थापन केलेल्या सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेचे सन २०२१- २२ ची ८२ वी सर्वसाधारण सभा रविवार दि. २५ सप्टेंबर रोजी वृंदावन लॉन्स एमआयडीसी जामगुंडी फॉर्म आसरा रेल्वे ब्रिजशेजारी जुळे सोलापूर येथे दुपारी एक वाजता आयोजित करण्यात आली असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष शिवानंद भरले यांनी यावेळी सांगितले.

संस्थेकडे अहवाल अखेर ठेवी १३२ कोटी चार लाख भाग भांडवल बहात्तर कोटी १७ लाख गंगाजळी दहा कोटी ३१ लाख तसेच संस्थेच्या एकूण १३ शाखा आहेत वैराग शाख वगळता प्रत्येक शाखेला अद्यावत इमारती असून स्थावर जंगम मालमत्तेच्या रूपाने आज अखेर पाच कोटी २४ लाख रकमेची संस्थेची मालमत्ता असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष भरले आणि यावेळी दिली.

कर्जाची थकबाकीचे प्रमाण झिरो पॉईंट ६६७ इतके आहे कर्जावर दर्शन दर शेकडा दहा रुपये वीस पैसे दराने व्याज आकारणी केली.

या पत्रकार परिषदेत संस्थेचे अध्यक्ष शिवानंद भरले उपाध्यक्ष राम इंगळे संस्थेचे माननीय संचालक यादवाड मच्छिंद्रनाथ मोरे आप्पासाहेब देशमुख दादाराजे देशमुख संजय खेडेकर केशवराव घोडके महादेव जठार हनुमंत सरडे बाळासाहेब गोरे आधी उपस्थित होते.

# राजा राममोहन रॉय यांनी महिला सक्षमीकरणाचा मंत्र दिला

### केंद्रीय माहिती व प्रसारण अधिकारी अंकुश चव्हाण यांचे प्रतिपादन

सुराज्य/सोलापूर

**आपल्या देशात अशा महान विभूती जन्माला आल्या की ज्यांच्यामुळे जनमानसाला विचाराची नवी दिशा मिळाली. त्यामुळे समाज बदलला, नवी शिकवण अंगीकारली, नव्याची कास धरली, स्त्रियांचा सन्मान व सहभाग वाढला. या महान व्यक्तींपैकी एक थोर समाज सुधारक म्हणजे राजा राममोहन रॉय होत. राजा राममोहन रॉय यांनी आधुनिक भारताची सुरुवात केली. त्यांच्या कार्यामुळे भारतात एकोणिसाव्या शतकात धर्मसुधारणेची चळवळ सुरू झाली. राजा राममोहन रॉय यांनी महिला सक्षमीकरणाचा मंत्र दिला, असे प्रतिपादन केंद्रीय माहिती व प्रसारण अधिकारी अंकुश चव्हाण यांनी केले.**

आधुनिक भारताचे जनक राजा राममोहन रॉय यांच्या २५० वी जयंतीनिमित्त जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, सोलापूर व राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान कोलकाता यांच्या संयुक्त विद्यमाने 'महिला सक्षमीकरण जनजागृती रॅली'चे आयोजन केले होते. या रॅलीच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते.



तहसीलदार अंजली मरोड म्हणाल्या, 'आजची पिढी मोबाईल पाहण्यात गुंतली आहे. त्यामुळे डोळ्यावर विपरीत परिणाम होत आहे. ग्रंथवाचनाने बुद्धीला प्रेरणा मिळते, म्हणून वाचाल तर वाचाल असा संदेश दिला.'



## वेळापूर येथील मुलींच्या शाळेचा उत्कृष्ट शाळा पुरस्काराने गौरव

**वेळापूर** : सोलापूर जिल्ह्यातील पहिली सायकल बँक योजना राबविणारी आणि १६ संगणकांचा अद्ययावत संगणक कक्ष कार्यान्वित करणाऱ्या वेळापूर ता. माळशिरस येथील जिल्हा परिषदेच्या मुलींच्या शाळेला ब्रह्मदेव दादा माने शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या व सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा आचार्य दादासाहेब दोंदे उत्कृष्ट शाळा पुरस्कार माजी आमदार दिलीप माने यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच माळशिरस तालुक्यातून आचार्य दादासाहेब दोंदे गुणवंत शिक्षक पुरस्कार जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेंडगे वस्ती, मांडवे येथील महादेव अंकुश पालवे यांना प्रदान करण्यात आला.महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे सर्वोच्च नेते संभाजीराव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आचार्य दादासाहेब दोंदे शिक्षक आणि उत्कृष्ट शाळा पुरस्कार समारंभात राज्य शिक्षक संघाचे कार्यकारी अध्यक्ष तथा जिल्हा शिक्षक संघाचे अध्यक्ष मच्छिंद्रनाथ मोरे, राज्य सल्लागार मंडळाचे अध्यक्ष लहू कांबळे, शिक्षक नेते तात्यासाहेब यादव, बब्रुवाहन काशीद, आप्पासाहेब देशमुख ,जोतीराम बोंगे, जिल्हा महिला अध्यक्षा चंदाराणी आतकर, गटशिक्षणाधिकारी बापूसाहेब जमादार, बापूसाहेब पाटील, संजय सावंत, अनिरुध्द पवार अशोक पवार, संजय काशीद, हनुमंत सरडे, विजय शिंदे यांच्यासह तालुका व जिल्हा शिक्षक संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. पुरस्कार शाळेचे मुख्याध्यापक अनंता जाधव, केंद्रप्रमुख राजू घाडगे, शिक्षक राजेंद्र जाधव, जाविद मुलाणी, कृष्णदेव तुपे, हनुमंत खताळ यांनी स्वीकारला.



## सिनेट सदस्य राजा सरवदे यांचा रिपाइं माळशिरसवतीनेच्या सत्कार

**वेळापूर** : रिपाइं प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांची आहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर सिनेट सदस्यपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दलरिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले माळशिरस तालुका यांच्या वतीने राजाभाऊ सरवदे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प.महा.नेते दयानंद धाईंजे, एन के साळवे, जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, युवा कार्याध्यक्ष किरण धाईंजे, माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंदराव सरतापे, ता मार्गदर्शक भास्कर बनसोडे, ता कार्याध्यक्ष समाधान भोसले, युवा अध्यक्ष दशरथ नवगिरे, संघटन सचिव पोपट गेजगे, ता उपाध्यक्ष संतोष कांबळे, ता उपाध्यक्ष राम कांबळे, ता उपाध्यक्ष शेखर सावंत, संपर्क प्रमुख आण्णासो भोसले, ता सचिव दादासाहेब सरतापे, ता सचिव आण्णासो गेजगे, युवा ता सचिव राजरत्न नाईकनवरे ,उपाध्यक्ष संतोष चंदनशिवे, उपाध्यक्ष बाबासाहेब भोसले, माळशिरस शहराध्यक्ष पुष्कर धाईंजे, संदिपान पाटील ,कुमार लोंढे, सावता भोसले, ओंकार सरतापे, ओम गेजगे आदी उपस्थित होते




## लेखक हरिश्चंद्र पाटील यांना राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार

**टेंभूर्णी** : येथील कवी,लेखक हरिश्चंद्र पाटील लिखित ' शिरवाळ ' या कथासंग्रहाला दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा यांचा राज्यस्तरीय पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडगीहाळ यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.वैजनाथ महाजन, ज्येष्ठ समीक्षक अविनाश सप्रे, अध्यक्ष भीमराव धुळुबुळु, कार्याध्यक्ष दि.बा. पाटील, उपाध्यक्ष गौरी भोगले, कार्यकारिणी सदस्य ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे आदी उपस्थित होते. कोल्हापूर येथील शाहू स्मारक सभागृहात हा पुरस्कार वितरण समारंभ पार पडला.यावेळी साहित्यप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लेखक हरिश्चंद्र पाटील यांच्या 'शिरवाळ' या कथासंग्रहापूर्वी त्यांच्या 'हुंदके मातीचे' या काव्यसंग्रहाला अनेक साहित्य संस्थांनी साहित्य पुरस्कार देऊन गौरविले आहे. त्यांचे आगामी साहित्य हंबर, ओवाळणी, कंत्राट, खरा वारस, मामाचा गाव, सोन्याचा दगड हे कथासंग्रह तर अजूनही आठवते हा कवितासंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे. शिरवाळ कथासंग्रहाला साहित्य पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अंकुश गाजरे, गणपत जाधव, भास्कर सोनवणे, दत्तात्रय भुजबळ, पंडित वाघावकर, नाथा सावंत, रहिमतुल्ला शेख,भागवत माळी, सुरेश नाळे, विठ्ठल शिंदे, डी.के. देशमुख, किसन कुटे, हमीद आवटे, राजेंद्र माळी, विनोद तांबे, भास्कर बंगाळे, अरूण कटारे, महेश जवंजाळ यांनी लेखक हरिश्चंद्र पाटील यांचे अभिनंदन केले. तसेच पुढील साहित्यिक वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## मराठीत प्रथमच सात मराठी चित्रपटांची घोषणा

**सोलापूर** : मराठी मनोरंजन विश्व हे अधिकाधिक व्यापक बनत चाललेलं आहे. याचाच परिपाक म्हणून इतर भाषांमधील निर्मातेही मराठी चित्रपटनिर्मितीच्या क्षेत्रात उतरत आहेत. याचीच प्रचिती बुधवारी मुंबईत पार पडलेल्या एका रंगारंग सोहळ्यात आली. हिंदीमध्ये अनेक सुपरहिट चित्रपटांचे लेखन आणि निर्मिती करणा-या परितोष पेंटर यांच्या कॅलिडोस्कोप सिनेमाअँड पिक्चर्स प्रॉडक्शन्स आणि राजेशकुमार मोहंती यांच्या एस. आर एन्टरप्रायजर्स या दोन मोठ्या निर्मितीसंस्थांनी एकत्रितपणे नव्या सात चित्रपटांमध्ये निरवधी, सुटका, एप्रिल फुल, फक्त महिलांसाठी, थ्री चिअर्स, एकदा येऊन तर बघा आणि ती मी नव्हेच' या सात कलाकृतींची घोषणा करण्यात आली.

## उजनीच्या कुशीत पीकपध्दतीत बदल

# जळगावची मक्तेदारी मोडीत काढत सोलापूरची केळी दर्जेदार

### ▪ निर्यातक्षम केळीला मिळतोय २५ रुपये किलोचा भाव

**सुराज्य/सोलापूर**

केळी पिकामधील जळगावची मक्तेदारी सोलापूर जिल्ह्यातील करमाळ्याच्या शेतकऱ्यांना मोडीत काढली असून ही केळी दर्जेदार व निर्यातक्षम असून प्रति किलोला पंचवीस रूपये इतका दर मिळत असल्याने केळी उत्पादक शेतकरी मालामाल होत आहे. उजनी बँक वॉटर परिसरातील कुगाव, वाशिंबे, कडेगाव, शेटफळ, वांगी, कंदर, केतूर, जिंती, चिखलठाण, निंभोरे, गुळसडी या भागात तब्बल १४ हजार एकर परिसरात केळीची पिके उभी आहेत.

केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या निर्यातक्षम केळींचा दर वाढल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे येथील झुंबर पोळ या शेतकऱ्याला चार एकर क्षेत्रावर पंचवीस लाख रुपयांचे उत्पन्न मिळणार आहे. निर्यातक्षम केळींची अशी स्थिती असली तरी थोड्याशा कमी प्रतीच्या केळीला व खोडव्याला स्थानिक बाजारपेठेत अपेक्षित भाव मिळत नसल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. सध्या निर्यातक्षम केळींचा तुटवडा असल्याने सर्वच केळी निर्यात कंपन्यांकडून उपलब्ध केळींचा दर वाढला असून शेटफळ तालुका करमाळा येथील शेतकरी झुंबर भागवत पोळ यांची केळी पंचवीस रुपये दराने सनरिया कंपनीसाठी केळी व्यापारी विष्णू पोळ यांनी पंचवीस रुपये दराने खरेदी केली आहे तर येथील बाळासाहेब रोंगे यांची यांची केळी व्यापारी आशिष पाटील यांनी वंडर बेरीसाठी तर अनिल मारकड विकास जाधव यांच्यासह इतर शेतकऱ्यांची केळी पारस गुंड यांनी इतर कंपनीसाठी सव्वीस रूपये या दराने खरेदी केली आहे. सध्या निर्यातक्षम केळी उत्पादक शेतकऱ्यांना चाग़ले दिवस आले आहेत. गेल्या वर्षी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर केळी रोपांची टंचाई व खराब हवामानाच्या काळात या शेतकऱ्यांनी केळी लागवड करून मोठ्या कष्टाने हे पिक उभे केले आहे. सध्या करमाळा तालुक्यातील निर्यातक्षम केळीला आखाती देशात मोठी मागणी असल्याने केळी निर्यात कंपन्यांमध्ये स्पर्धा सुरू झाली आहे.

**केळीला हमीभाव मिळाला पाहिजे**

सध्या केळी उत्पादन कमी असल्याने करमाळा तालुक्यातील निर्यातक्षम केळीला चांगला दर मिळत असला तरी काही दिवसांत थंडी वाढल्यानंतर चिलींगच्या कारणास्तव निर्यातदार माल रिजेक्ट करतात. यावेळी दर पाडले जातात म्हणून केळीला हमी भाव मिळाला पाहिजे अशी मागणी आमच्या संघटनेच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांना केली आहे.

**- वैभव पोळ,** तालुकाध्यक्ष महाराष्ट्र केळी उत्पादक संघ



**शालेय पोषण आहारात केळीचा समावेश करावा**

शालेय पोषण आहार योजनेअतंर्गत विद्यार्थ्यांना पोषण आहारात केळीचा समावेश केला पाहिजे. जिल्ह्यात ३० हजार हेक्टर पेक्षा जास्त केळी लागवड आहे. विद्यार्थ्यांना पोषण आहार पाकिट बंद पुरक आहार देण्या ऐवजी केळीचा समावेश केल्यास विद्यार्थ्यांच्या बुध्दीमत्तेत आणि सद्रढतेत वाढ होईल. त्यातील जिवनसत्वामुळे रोग प्रतिकार शक्ती वाढण्यास उपयुक्त असल्याचे संशोधनातून समोर आले आहे. याचा निश्चितच फायदा विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी होईल. त्यामुळे केळी खरेदीत वाढ होवून शेतकऱ्यांना अधिकचा दर मिळेल. याचा सरकारने सकारात्मक विचार करून विद्यार्थी व शेतकरी हिताचा निर्णय घ्यावा.

**- धुळाभाऊ कोकरे,** केळी उत्पादक (कुगाव, ता.करमाळा)

आखाती देशांमध्ये सोलापूरच्या केळीला चांगली मागणी असून सध्या शेतकऱ्यांना दरही चांगला मिळत आहे. शेतकऱ्यांनी केळीच्या दर्जा व गुणवत्तेकडे लक्ष दिल्यास निर्यातक्षम केळीला कायम चांगले दर पुढील काळातही मिळतील. यासाठी शेतकऱ्यांनी लागवडीचे व फ्रुटकेअरचे योग्य नियोजन करण्याची गरज आहे.

**- अमोल महाजन,** केळी निर्यातदार सनरिया ग्रो जळगाव




## एसपी सातपुते यांच्या हस्ते चपळगावमध्ये सीसीटीव्हीचे लोकार्पण

**अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यातील चपळगाव येथे ग्राम सुरक्षिततेसाठी ग्रामपंचायत व बालाजी अमाईन्स सोलापूरचे उद्योगपती रामा रेड्डी यांच्या सहकार्याने बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेराचा लोकार्पण सोहळा पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या हस्ते संपन्न झाला.

प्रारंभी चपळगाव प्रशालेच्या एनसीसी विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली. पोलीस अधीक्षक सातपुते यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी चपळगावचे कर्तव्यदक्ष सरपंच उमेश पाटील होते.यावेळी गरजू व गुणवंतांना समाजसेवक तथा आयोजक तम्मा गजधाने यांच्या शिवम्मा प्रतिष्ठानच्यावतीने शालेय साहित्य वाटप करण्यात आले.अंगणवाडी व आरोग्य सेविका यांचाही मानसन्मान करण्यात आला.एल.आय.सी.चे प्रतिनिधी सुरेश सुरवसे यांच्या माध्यमातून चपळगावाला एक लाख रुपयांचे बीमा ग्राम पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचाही सपत्नीक येथे सन्मान करण्यात आला.चपळगाव चे सरपंच उमेश पाटील यांनी ग्राम सुरक्षा व ग्रामविकासाच्या कामाची सविस्तर पणे माहिती आपल्या अध्यक्षीय भाषणात करुन दिली. ऑपरेशन परिवर्तन मोहीम यशस्वीरित्या राबविल्याबद्दल पोलीस अधीक्षक सातपुते यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी अक्कलकोटचे उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्रसिंह गौर, सांगोल्याचे पोलीस निरीक्षक अनंतराव कुलकर्णी, पोलीस निरीक्षक प्रदीप काळे, एलआयसी सोलापूर ९५ शाखाधिकारी भाऊसाहेब लबडे, उपशाखाधिकारी गणेश टेकाळे, विकासाधिकारी योगेश धर्माधिकारी यांची खास उपस्थिती होती.तंटामुक्त समिती अध्यक्ष महेश पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. याप्रसंगी ज्येष्ठ नेते अंबणप्पा भंगे, सिद्धाराम भंडारकवठे, संजय बाणेगाव, महादेव वाले, श्रावण गजधाने, विनोद गजधाने, अमोल गजधाने, निलेश गजधाने, लखन गजधाने, भागवत गजधाने, खाजपा गजधाने, कमलाकर जैनजांगडे, राजू गजधाने, जयभीम गजधाने, परमेश्वर वाले, प्रदीप वाले, मल्लिनाथ सोनार, महिबूब तांबोळी, शिवजन्मोत्सव प्रतिष्ठानचे मनोज इंगुले, विशालराज नन्ना, अविनाश कदम, प्रकाश सुरवसे, शिवानंद उटगे, कुमार दुलंगे, रमेश शिंदे, गुलाब बाणेगाव, तंटामुक्त उपाध्यक्ष सायबण्णा म्हमाणे व बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर कदम तर आभार बसवराज बानेगाव यांनी मानले.

## पोखरापुरात शेतकऱ्यास जातीवाचक शिवीगाळ करून जबर मारहाण

**सुराज्य/मोहोळ**

पोखरापूर (ता मोहोळ )येथे एका शेतकऱ्यास जातीवाचक शिविगाळ करित डोक्यावर पाठीवर व छातीजवळ दाताळाने मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना २० सप्टें रोजी पाच वाजता घडली

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पांडुरंग भानुदास राऊत वय ५० यांची पोखरापूर येथे गट नंबर ५३५ येथे शेत जमीन आहे त्यांचे शेजारीच सिताराम माणिक कारंडे यांची जमीन आहे सिताराम कारंडे हे नेहमीच बांधावर झाडे तोडायचे हा प्रकार मागील चार-पाच वेळा झाला त्यांना झाडे तोडू नको म्हणत असतानाही ते ऐकत नाही राऊत त्यांनी यापूर्वीकधीही भांडण केले नव्हते व पोलिसात तक्रारही दिली नव्हती.


पण कारंडे यांचा त्रास सुरू होता २० सप्टेंबर रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास पांडुरंग राऊत व त्यांची पत्नी असे दोघे मिळून शेताकडे गेले असता त्या ठिकाणी कारंडे हे बांधावरील लिंबाचे झाडे तोडत असलेला त्यांनादिसला याबाबत तू झाडे तोडू नकोस त्यामुळे बांधाची माती राहात नाही असे सांगितले असता तुला काय करायचे ते कर म्हणत कारंडे यांनी जातीवाचक शिवीगाळ केली पाठीमागून येऊन कारंडे याने हातातील दाताळाने राऊत यांच्या डोकीमध्ये पाठीवर व बरगड्यावर तुला आता जिवंत सोडणार नाही खल्लास करतो असे म्हणत गंभीर मारहाण केली यामुळे राऊत हे रक्तबंबाळ झाले राऊत यांच्या पत्नीने आरडाओरडा करतात कारडे हे पळून गेले नातेकांनी त्यांच्या मदतीने त्यांना मोहोळ येथे प्राथमिक प्राथमिक उपचार करून सोलापूर येथे पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले त्यानंतर ते सोलापूर येथीलच हॉस्पिटलमध्ये ऍडमिट झाले व त्यानंतर त्यांनी मोहोळ पोलिसांना याबाबत तक्रार दिली कारंडे यांच्या विरोधात मारण्याचा प्रयत्न करून जातीवाचक शिविगाळ केल्या बाबत गुन्हा दाखल करण्यात आल्या आहे या घटनेचा पोलिस उपअधिक्षक तपास अमोल भारती हे करत आहे.



## भक्तगण देवीज्योत आणण्यासाठी कोल्हापूर, तुळजापूरला रवाना

**अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यात कोरोना महामारीमुळे गेली दोन वर्षे नवरात्र महोत्सव साजरा करता न आल्याने यंदाच्या नवरात्र महोत्सवाची तयारी पहाता सर्वत्र देवीभक्तगणात उत्साह संचारल्याचे पहायला मिळत आहे.तालुक्यातील अनेक गावातील देवी तरुण मंडळांनी कोल्हापूर,तुळजापूर व वणी येथील सप्तशृंगी देवीची ज्योत आणण्यासाठी रवाना होताना दिसून येत आहेत.यंदा तालुक्यात समाधानकारक पाऊस झाल्याने शेतशिवारात सर्वत्र पाणीच पाणी पहायला मिळत आहे. यामुळे देवीभक्तगणांना घराची साफसफाई करणे,कपडे धुण्यासाठी मदत होत आहे.अक्कलकोट तालुक्यातील ग्रामीण भागातील देवी भक्तगण देवीच्या श्रध्देपोटी दरवर्षी कोल्हापूर महालक्ष्मी, तुळजापूर अंबाबाई, वणी येथील सप्तसृंगी देवीची ज्योत आणण्यासाठी मार्गस्थ होताना पहायला मिळतात. यंदा तालुक्यातील हिळळी येथील महादेवी भक्तगणांना ज्योत आणण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.कारण उजनी धरणातून मोठ्याप्रमाणात पाणी सोडण्यात आल्याने वाहतूक मार्ग ही बंद झाले आहे.यामुळे देवीभक्तगण भीमा नदीचे पात्र ओलांडताना ट्रॅक्टरच्या साह्याने नदी पार करुन पुन्हा टेम्पोत बसून देवीचा जयघोष करीत आज कोल्हापूर महालक्ष्मी ज्योत आणण्यासठी रवाना होताना दिसून आले. हिळळी येथील महादेवी तरुण मंडळाला गावातीलच अशोक यादवाड यांनी पाच हजार रुपये, गुंडप्पा फुलारी पाच हजार, शिवानंद बाके पन्नास किलो रवा, संजय पुजारी पन्नास किलो रवा, आप्पाशा शटगार एक तेल डबा, उपसरपंच सलीम मुजावर एक तेल डबा, शेखर सावळगी आंदेवाडी ३० किलो तांदुळ, महादेव शटगार १० किलो शेंगदाणा, काशप्पा हडपद ५ किलो शेंगदाणा, अनिल मेंथे ५ किलो शेंगदाणा, शरणबसप्पा करंडे ५ किलो तेल व पाच किलो शेंगदाणा, किरण शिवशरण ५० किलो कांदे, डॉ.ख्याता यांनी सर्व देवी भक्तांना मोफत गोळी औषध पुरविले, भिमा मर्जी ५ किलो शेंगदाणा, दिलीप यादवाड यांनी मसाला साहित्य पुरवठा केला.

## लम्पीच्या जागृतीसाठी पशुपालक मेळावा : परिचारक



**सुराज्य/पंढरपूर**

आजादी का अमृत महोत्सव आणि राष्ट्रीय नेता ते राष्ट्रपिता या सेवा पंधरावड्यानिमित्त माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका दूध उत्पादक संघ आणि पशुसंवर्धन विभाग यांच्या वतीने लम्पी आजाराच्या जागृतीबाबत पशुपालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती युवानेते प्रणव परिचारक यांनी दिली. गेल्या काही दिवसापासून देशात राज्यात लम्पी या विषाणूजन्य त्वचारोगामुळे हजारो जनावरे बाधित होत आहेतम मृत्युमुखी पडत आहेत. सोलापूर जिल्ह्यातही लम्पी आजाराचा प्रादुर्भाव झाला आहे. अशा परिस्थितीत पशुपालकांना योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन करण्यासाठी मार्गदर्शक शिबिर पंढरपूर तालुक्यातील करकंब या ठिकाणच्या आनंदी मंगल कार्यालय आणि पंढरपूर येथील अर्बन बँकेच्या कर्मयोगी सभागृहात आयोजित करण्यात आले आहे.



यासाठी पशुवैद्यक महाविद्यालय परभणी येथील डॉ. नितीन मार्कंडे हे मार्गदर्शन करणार आहेत. हा कार्यक्रम रविवारी २५ सप्टेंबर रोजी करकंब येथे सकाळी दहा वाजता आणि पंढरपूर येथे दुपारी चार वाजता होणार आहे. तरी पशूपालक मेळाव्यासाठी शेतकरी आणि पशुपालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या पशुधनाच्या काळजीसाठी पुढाकार घ्यायचा आहे. याबाबत पंढरपूर तालुका दूध उत्पादक संघ पशुसंवर्धन विभाग आणि पांडुरंग परिवार यांच्या वतीने माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या सुचनेवरुन प्रणव परिचारक यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक झाली असून या बैठकीस सेवानिवृत्त पशुसंवर्धन अधिकारी डॉ विश्वास मोरे,पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ भिंगारे व इतर पशु अधिकारी उपस्थित होते. या पशुपालक मेळाव्यास जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन प्रणव परिचारक यांनी केले आहे.

# सोलंकरवाडीत गाईच्या डोहाळे जेवणाचा कार्यक्रम

### श्री विठ्ठल झाडकर यांचा हटके उपक्रम

**सुराज्य/मोडनिंब**

नव्या पाहुण्याच्या आगमनाची चाहूल लागताच घरात आनंदीआनंद असतो.सातव्या महिन्यात डोहाळे जेवण घातले जाते. यात लेक किंवा सुनेचे लाड केले जातात. हे चित्र सर्वत्रच पाहायला मिळतात पण माढा तालुक्यातील सोलंकरवाडीत मात्र लाडक्या देशी गायीचे डोहाळे जेवण उत्साहात घालण्यात आले.



गेल्या काही वर्षांपूर्वी मोडनिंब परिसरात देशी गाईची संख्या प्रचंड कमी झाली होती. अलीकडच्या काही वर्षांत गाईचे महत्त्व पटू लागल्यामुळे पुन्हा शेतकऱ्यांकडून देशी गाईचे संगोपन करण्यावर भर दिला जाऊ लागला आहे. त्यामुळे मोडनिंब परिसरातील अनेक गावांमध्ये देशी व गीर गाईची संख्या वाढू लागली आहे.

सोलंकरवाडी येथील जय हनुमान कृषी विकास गटाचे सदस्य श्री विठ्ठल झाडकर हे शेतकरी देशी गाईसह शेळ्यांचेही संगोपन करतात.पत्नी जयश्री झाडकर याच्या संकल्पनेतून गाईच्या डोहाळे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गाईचे दूध लहान मुलांसह ज्येष्ठांसाठी अत्यंत गुणकारी असते.गाईला शेतकरी मातेचा दर्जा देतात. त्यामुळे गाईचे संगोपन करण्याचा निर्णय घेतल्याचे विठ्ठल झाडकर यांनी सांगितले. लाडक्या गाईच्या डोहाळे कार्यक्रमानिमित्त विठ्ठल झाडकर यांनी गायीला फुलांच्या माळांनी सजविले होते.

कार्यक्रमासाठी गावातील महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. गायीसाठी कळयाचे लाडू,करंज्या, सजुऱ्या, तीन प्रकारचे पशुखाद्य डिश, केळीची फणी असे पंचपक्वान्न ठेवले होते. गाईच्या डोहाळे कार्यक्रमाचे कौतुक उपस्थित नागरिक करीत होते. या हटके कार्यक्रमाची चर्चा सोलंकरवादी गावासह परिसरातील गावात व सोशल मीडियावर चांगलीच रंगली आहे व झाडकर यांच्या उपक्रमाचे कौतुक होत आहे यावेळी सरपंच श्री अनंता गलांडे यांचे सह ग्रामस्थ महिला व पाहुणे मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उत्साहात या, शिस्त पाळा : ठाकरे

## दसरा मेळाव्याच्या परवानगीनंतर शिवसैनिकांना आवाहन

✔ सुराज्य/मुंबई

**उत्साहामध्ये या, वाजत-गाजत या, शिस्तीने या कुठेही आपल्या तेजस्वी परंपरेला गाळबोट लागेल असे कृत्य करू नका', असे आवाहन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांना केले आहे. मुंबई उच्च न्यायालयाने दुपारी शिवाजी पार्कातील दसरा मेळाव्याबाबत झालेल्या सुनावणीवेळी शिवसेनेला परवानगी दिली. मात्र, ही परवानगी देण्यापूर्वी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याबाबत शिवसेनेच्या वकिलांकडे विचारणा केली. त्यावेळी त्यांनी आम्ही असे कोणतेच कृत्य करणार नाही', असे आश्वासन न्यायालयाला दिले.**

मुंबई उच्च न्यायालयाने शिवाजी पार्कातील दसरा मेळाव्याला परवानगी दिल्यानंतर मुंबईसह राज्यभरात जल्लोष साजरा करण्यात आला. याच पार्श्वभूमीवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी गेल्या ६६ सालापासून विजयादशमीच्या दिवशी आमचा मेळावा होतो.

या दसरा मेळाव्याच्या परवानगीबाबतच्या केसमध्ये शिवसेनेला विजय मिळाला आहे. आमचा न्यायदेवतेवरचा विश्वास सार्थ ठरला आहे, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले. तसेच, न्यायदेवेतेने आमच्यावर जो विश्वास टाकलेला आहे, त्याबाबत शिवसैनिकांना मी आवाहन करतो की, त्यांनी उत्साहामध्ये या, वाजत-गाजत




या, शिस्तीने या कुठेही आपल्या तेजस्वी परंपरेला गाळबोट लागेल असे कृत्य करू नका, असेही त्यांनी म्हटले.

आपल्या तेजाच्या वारश्याला गालबोट लागेल, असे होऊ देऊ नका. कारण इतर काय करतील, त्यांची मला कल्पना नाही. पण आपली परंपरा आहे. आपल आपल्या महाराष्ट्राच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्ये प्रतिनिधीत्व करत आहोत. या दसरा मेळाव्याकडे केवळ महाराष्ट्रातच नवे तर, देशासह जगभरातील बांधव याकडे पाहत आहेत. आजच्या न्यायालयाच्या निकालाकडेही त्यांचे लक्ष होते, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

आमची शिवसेना वाढलेली आहे. परवा आमचा मुंबईतील शिवसेनेच्या गटप्रमुखांचा मेळावा होता, त्यावेळी बरेचजण तिथे उपस्थित होते. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी न्यायालयाने राज्य सरकारवर टाकलेली आहे. त्याच्यामुळे राज्य सरकारसुद्धा याला जबाबदार राहणार आहे. त्यामुळे राज्य सरकार त्यांचे योग्य काम करेल, असे उद्धव ठाकरे यांनी कायदा आणि सुव्यवस्थेबाबत सांगितले.

# कॅनडातल्या भारतीय विद्यार्थ्यांना सरकारचा सावधानतेचा इशारा



✔ सुराज्य/नवी दिल्ली

**भारताने कॅनडात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना सावधानतेचा इशारा दिला आहे. कॅनडात भारतविरोधी कारवायांमध्ये तीव्र वाढ झाली असून द्वेष पसरवला जात आहे. या पार्श्वभूमीवर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने विद्यार्थ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. कॅनडातील द्वेषपूर्ण गुन्हे, सांप्रदायिक हिंसाचार आणि भारतविरोधी कारवायांवर परराष्ट्र मंत्रालयाची करडी नजर आहे.**

अशाप्रकारच्या गुन्ह्यांचा तपास करुन गुन्हेगारांवर कारवाई करण्यात यावी, अशी विनंती परराष्ट्र मंत्रालयाकडून कॅनडा प्रशासनाकडे करण्यात आली आहे. कॅनडामध्ये राहत असलेले भारतीय नागरिक आणि विद्यार्थी यांनी खबरदारी घेणे आवश्यक आहे. जे लोक प्रवासासाठी अथवा शिक्षणासाठी कॅनडामध्ये जायच्या तयारीत आहेत, त्यांनी योग्य खबरदारी घेत सतर्कता बाळगावी, असे निवेदन परराष्ट्र मंत्रालयाने प्रसिद्ध केले आहे.

कॅनडातील भारतीय नागरिक आणि विद्यार्थ्यांनी ओटावातील भारतीय मोहिमेत अथवा टोरंटो आणि वॅनक्युवरमधील वाणिज्य दुतावासात नोंदणी करावी, असे आवाहन भारत सरकारकडून करण्यात आले आहे. यामुळे आणीबाणीच्या काळात भारतीय उच्चायुक्त किंवा दूतावासाला भारतीय नागरिकांशी संपर्क साधणे सोयीस्कर होईल, असे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.

कॅनडात भारतीय विद्यार्थ्यांवर हल्ले वाढले आहेत. मंगळवारी ऑन्टारियोमध्ये झालेल्या गोळीबाळात एका भारतीय विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. सतिवदर सिंग असे या घटनेत मृत झालेल्या २८ वर्षीय तरुणाचे नाव आहे. सतिवदर भारतातून कॅनडामध्ये शिक्षणासाठी गेला होता. 'एम. के. ऑटो रिपेअर्स' या दुकानात तो अर्धवेळ नोकरी करत होता. सतिवदरच्या मृत्यूनंतर कॅनडातील विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# अदानी-अंबानी यांच्यात 'नो पोचिंग' करार



### कर्मचाऱ्यांना एकमेकांच्या कंपनीत नो एन्ट्री

✔ सुराज्य/नवी दिल्ली

**व्यावसायिक क्षेत्रात आता आणखी एक परदेशी संकल्पना भारतात रुजू होत आहे. गौतम अदानी आणि मुकेश अंबांनी यांनी नो पोचिंग ही संकल्पना भारतात आणली असून यासंदर्भात या दोन्ही कंपन्यांमध्ये महत्त्वपूर्ण करार झाला आहे.**

यानुसार, अदानी समूहाचे कर्मचारी रिलायन्स इंडस्ट्रीजमध्ये काम करू शकणार नाहीत. तसेच, मुकेश अंबांनी यांच्या रिलायन्स इंडस्ट्रीतील कर्मचारी अदानी समूहात काम करू शकणार नाहीत. या करारालाच 'नो पोचिंग' असे म्हणतात.

टॅलेंट वॉर आणि पगारवाढीसाठी कर्मचारी सतत नोकऱ्या बदलत असतात. आपल्याच क्षेत्रात वारंवार नोकऱ्या बदलत गेल्याने चांगली हाईकसुद्धा मिळते. मात्र, कंपन्यांना याचा तोटा होत असतो. कर्मचारी आपली कंपनी सोडून आपल्याच प्रतिस्पर्धी कंपनीत रुजू होते, यामुळे आपल्या कंपनीतील टॅलेंट दुसऱ्या कंपनीत गेल्याने कंपनीला हानी पोहोचू शकते. हाच प्रकार टाळण्यासाठी अदानी समूह आणि रिलायन्स इंडस्ट्रीने 'नो पोचिंग' हा करार केला आहे. यानुसार, अदानी समूहातील कर्मचाऱ्यांना रिलायन्स इंडस्ट्रीमध्ये नो एन्ट्री असेल, तर रिलायन्स इंडस्ट्रीतील कर्मचारी अदानी समूहात येऊ शकणार नाहीत.

यामुळे एका कंपनीतील टॅलेंट दुसऱ्या कंपनीत जाऊ शकणार नाही. अदानी समूह आता रिलायन्स इंडस्ट्रीजचे वर्चस्व असलेल्या व्यवसायात प्रवेश करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे हा करार झाला असल्याचे सांगण्यात येतेय.

# मुंबईत आतापर्यंत दोन हजार मि.मी. पावसाची नोंद

✔ सुराज्य/मुंबई

**मुंबई शहर भागात जूनपासून २३ सप्टेंबर या कालावधीत दोन हजार मि.मी., तर पश्चिम उपनगरांमध्ये २६१७ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. संपूर्ण जून महिना कोरडा गेल्यानंतर जुलैमध्ये पावसाने दमदार हजेरी लावली होती. ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये आतापर्यंत मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला आहे. हवामानखात्याच्या कुलाबा केंद्रात यंदा पावसाळ्यात २३ सप्टेंबरपर्यंत २०३७ मि.मी.,तर सांताक्रूझ केंद्रात २,६१७ मि. मी. पावसाची नोंद झाली आहे. जुलैमध्ये दमदार हजेरी लावणाऱ्या पावसाने काही काळ विश्रांती घेतली होती. मात्र ऑगस्टमध्ये पुन्हा दमदार हजेरी लावत पाऊस बरसला.**



गणेशोत्सव दरम्यानही पावसाचा मुक्काम कायम होता. सप्टेंबरच्या सुरुवातीपासून पावसाचा मुक्काम कायम होता. काही भागात गडगडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस कोसळला. देशात मोसमी पाऊस परतीच्या मार्गावर आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत मध्यम ते जोरदार पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. शुक्रवारी मुंबई शहर व उपनगरात साधारणतः ढगाळ वातावरण असेल आणि हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

### आयएसआय मॉड्यूलचा पर्दाफाश; दोघांना अटक

✔ सुराज्य/पंजाब

पंजाब पोलिसांनी दहशतवादी कारवायांशी संबंधित एका मोठ्या मॉड्यूलचा पर्दाफाश केला आहे. या टोळीकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रही जप्त करण्यात आली आहेत.

असे सांगितले जात आहे की, हे आयएसआय समर्थित दहशतवादी मॉड्यूल आहे ज्यावर कॅनडास्थित लखबीर लांडा आणि पाकिस्तानस्थित हरविंदर रिंडा यांचे नियंत्रण आहे. या मॉड्यूलच्या दोन सदस्यांना अटक करण्यात आली आहे.

# काँग्रेसचा पुढचा अध्यक्ष गांधी कुटुंबातून नाही!

✔ सुराज्य/पंजाब

**काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदावरून जोरदार चर्चा सुरू आहे. काँग्रेसचा पुढचा अध्यक्ष कोण होणार याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.**

राहुल गांधी यांनी २०१९ च्या निवडणुकीनंतर अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर सोनिया गांधींच हंगामी अध्यक्षा होत्या. मात्र, आता आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या अध्यक्षपदाची कमान दुसऱ्या खांद्यावर देण्याच्या हेतूने पक्षांतर्गत अध्यक्षपदासाठी निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. या निवडणुकीला अशोक गहलोत उभे राहणार आहेत. त्यांनीच याबाबत शुक्रवारी अधिकृत माहिती दिली.

काँग्रेसच्या अध्यक्षपदाच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर शशी थरूर, मनीष तिवारी आदी नेते निवडणूक लढवणार असल्याची चर्चा आहे.

# मॉलमधील वाईन विक्रीवरून अण्णा भडकले



✔ सुराज्य/मुंबई

**तत्कालिन महाविकास आघाडी सरकारने मॉलमध्ये वाईन विक्री करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, जनतेच्या आणि भाजपाच्या विरोधानंतर हा निर्णय मागे घेण्यात आला होता. दरम्यान, राज्यातील सत्ताबदलानंतर शिंदे-फडणवीस सरकारने पुन्हा मॉलमध्ये वाईनविक्री सुरू करण्याचे संकेत दिले आहेत. यावरून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी राज्य सरकारला इशारा दिला आहे.**

दरम्यान, उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी मॉलमधली वाईनविक्री सुरू करण्याचे संकेत दिले होते. मॉलमध्ये वाईन विक्रीचा मसुदा जेव्हा जनेसाठी खुला करण्यात आला होता. आम्ही या संदर्भात लोकांची मत जाणून घेतली. जुलै महिन्याच्या अखेरीपर्यंत अनेकांनी याबाबत सुचना केल्या आहेत. त्यानुसार या निर्णयाच्या समर्थनात आणि विरोधात किती जणं आहेत, त्याचा अभ्यास सुरू आहे. विभागाचे सचिव आणि आयुक्त यावर काम करत आहेत.

येत्या १५ दिवसांत यासंदर्भातला अहवाल माझ्याकडे येईल, त्यानंतर मी स्वत: याचा अभ्यास करून लोकांची मत काय आहेत, हे जाणून घेतल्यानंतर आम्ही पुढचा निर्णय घेऊ, यासंदर्भात मी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चाही करणार आहे, अशी प्रतिक्रिया उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी दिली होती.

### काय म्हणाले अण्णा?

मॉल संस्कृती ही काही भारतीय संस्कृती नाही. ही विदेशातली संस्कृती आहे. विदेशातील संस्कृती भारतात आणायची आणि मग तिथे नको ते गोष्टी विकायला ठेवायच्या हे बरोबर नाही. आताचं सरकार मॉल, दारू यासारख्या गोष्टींचा विचार करणार नाही, असा मला विश्वास आहे. मात्र, असं काही घडलंच तर आम्हांला आमच्या मार्गाने आंदोलन करावे लागले, असा इशारा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी दिला आहे.

# काबूलमध्ये पुन्हा बॉम्बस्फोट; ४ जणांचा मृत्यू

✔ सुराज्य/नवी दिल्ली

**अफगाणिस्तानच्या काबूलमध्ये पुन्हा मोठा बॉम्बस्फोट झाला आहे. वजीर मोहम्मद अकबर खान ग्रँड मशिदीजवळ हा स्फोट झाला आहे. यात ४ जणं ठार झाले असून १० जण जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे.**

प्राथमिक माहितीनुसार, नमाज अदा केल्यानंतर लोक मशिदीतून बाहेर पडत असताना हा स्फोट झाला. या स्फोटामुळे आजूबाजूच्या परिसरात धूळ आणि धुराचे लोट पसरले होते, त्यामुळे नेमका हा स्फोट कोणत्या बाजूने झाला हे



काही क्षण लोकांना समजवलेच नाही.

काबूल पोलिसांच्या माहितीनुसार, स्फोटात काही लोकं ठार झाले असून अनेक जण जखमी झाले आहे. काबूल गृहमंत्र्यांचे प्रवक्ते अब्दुल नफी तकोर यांनी सांगितले की, 'हा स्फोट मशिदीजवळ मुख्य रस्त्यावर झाला आहे. त्यामुळे स्फोटामागची कारणे तपासली जात आहेत. पोलिसांचे पथक घटनास्थळी असून प्रकरणाचा तपास सुरु आहे.'

गेल्या काही महिन्यांत स्थानिक इस्लामिक स्टेट गटाने अफगाण शहराला लक्ष्य केल्याची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. कालही काबूलमध्ये स्फोट झाला, ज्यात तीन जण ठार तर १३ जण जखमी झाले आहेत.

काबूल पोलीस प्रमुखांचे प्रवक्ते खालिद जद्रान यांनी सांगितले की, हा स्फोट शहराच्या पश्चिमेकडील देहमझाग येथील एका रेस्टॉरंटमध्ये झाला. स्फोटाचे कारण शोधण्यासाठी एक पथक परिसरात पोहोचले आहे.





# टाटांच्या सहा उपकंपन्या टाटा स्टीलमध्ये विलीन होणार

✔ सुराज्य/नवी दिल्ली

देशातील नामांकित टाटा समूहाची कंपनी असणारी टाटा स्टील ही आपल्या सहा उपकंपन्या स्वत:मध्ये विलीन करणार आहे.

कंपनीकडून शुक्रवारी जारी करण्यात आलेल्या एका निवेदनात ही माहिती देण्यात आली आहे. यासंबंधीच्या प्रस्तावाला कंपनीच्या संचालक मंडळाने गुरुवारी मंजुरी दिल्याचेही कंपनीच्या वतीने निवेदनात सांगण्यात आले आहे. निवेदनात असेही म्हटले आहे की, टाटा स्टीलच्या संचालक मंडळाने टाटा स्टीलमध्ये सहा उपकंपन्यांच्या प्रस्तावित विलीनीकरणाच्या योजनांचा विचार करून त्याला हिरवा कंदील दर्शवला आहे.

**या सहा कंपन्या टाटा स्टीलमध्ये विलीन होणार आहेत -**

टाटा स्टीलच्या ज्या उपकंपन्यांचे विलीनीकरण होणार आहे त्यामध्ये - टाटा स्टील लाँग प्रॉडक्ट्स लिमिटेड', द टिनप्लेट कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड', टाटा मेटालिक्स लिमिटेड', द इंडियन स्टील अँड वायर प्रॉडक्ट्स लिमिटेड, टाटा स्टील मायनिंग लिमिटेड आणि एस अँड टी मायनिंग कंपनी लिमिटेड, विलीन होणाऱ्या दोन उपकंपन्या संपूर्णपणे टाटा स्टीलच्या मालकीच्या आहेत.

टाटा स्टीलची टाटा स्टील लाँग प्रॉडक्स लिमिटेड' मध्ये ७४.९१ टक्के हिस्सेदारी आहे. याशिवाय द टिनप्लेट कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड'मध्ये ७४.९६ टक्के, टाटा मेटालिक्स लिमिटेड'मध्ये ६०.०३ टक्के आणि द इंडियन स्टील अँड वायर प्रॉडक्ट्स लिमिटेड'मध्ये ९५.०१ टक्के, तर टाटा स्टील मायनिंग लिमिटेड' आणि एस अँड टी मायनिंग कंपनी लिमिटेड' या त्यांच्या पूर्ण मालकीची उपकंपन्या आहेत. यासोबतच, कंपनीच्या बोर्डाने टाटा स्टीलची उपकंपनी TRF लिमिटेडचे देखील (३४.११ टक्के भागीदारी) टाटा स्टील लिमिटेडमध्ये विलीन करण्यासही मान्यता दिली आहे.

# तांदूळ निर्यात यंदा संकटात

## करनिर्णयामुळे बंदरांवर दहा लाख टन तांदूळ पडून; नोव्हेंबरमध्ये निर्णय

✔ सुराज्य/पुणे

**केंद्र सरकारने तुकडा तांदळाच्या निर्यातबंदीचा आणि बिगर बासमती तांदळावर वीस टक्के कर लावण्याचा निर्णय घेतल्यामुळे मुंबई, गुजरात आणि विशाखापट्टणम येथील बंदरांवर सुमारे दहा लाख टन तांदूळ निर्यातीच्या प्रतीक्षेत बंदरांवर पडून आहे. यामुळे व्यापाऱ्यांचे नुकसान होत असून, निर्यातीवरील निर्बंध आणि कर रद्द करण्यासाठी व्यापारी संघटना केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांच्याकडे पाठपुरावा करीत आहेत. पण, दोन महिन्यांनी होणाऱ्या या बाबतच्या निर्णयात कोणताही बदल होण्याची शक्यता दिसत नाही.**

भारतीय उद्योग व्यापार मंडळाचे राष्ट्रीय सहमंत्री, निर्यातदार राजेश शहा म्हणाले, देशातील प्रमुख बंदरांवर सुमारे दहा लाख टन तुकडा आणि बिगर बासमती तांदूळ पडून आहे. तर सुमारे वीस लाख टनांची झालेली आगाऊ नोंदणी अडचणीत आली आहे. मुळात पाच-सहा टक्के नफ्यावर सुरू असलेला हा व्यवसाय वीस टक्के निर्यात करामुळे ठप्प झाला आहे.

देशातून तांदूळ निर्यात करणाऱ्या व्यापाऱ्यांना हा वीस टक्के कर भरून व्यवसाय करणे शक्य नाही.

देशातून २०२१-२२ या आर्थिक वर्षांत १७० लाख टन बिगर बासमती (तुकडासह) तांदळाची निर्यात झाली होती. या निर्यातीतून सुमारे ४५ हजार कोटी रुपये देशाला मिळाले होते. यंदा तुकडा तांदूळ चीन आणि बांगलादेशातच प्रामुख्याने गेला आहे.

तांदूळ निर्यातीवरील निर्बंधांबाबत देशातील व्यापाऱ्यांनी केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांच्याकडे धाव घेतली. पण, गोयल यांनी तातडीने हस्तक्षेप करण्यास नकार दिला. नोव्हेंबर महिन्यात वाणिज्य मंत्रालयाच्या 'बोर्ड ऑफ ट्रेड'ची बैठक होणार आहे.

या बैठकीत देशातील एकूण तांदूळ लागवड, अपेक्षित तांदूळ उत्पादन, गोदामांमधील एकूण साठा आदी बाबींचा विचार करून तांदूळ निर्यातीवरील निर्बंध उठविण्याबाबत निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी ग्वाही गोयल यांनी दिली असल्याची माहिती बोर्ड ऑफ ट्रेड'वरील राज्याचे प्रतिनिधी आणि फेडरेशन ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष विनेष मेहता यांनी दिली आहे.

केंद्र सरकार वारंवार तांदूळ निर्यातबंदी करणार नाही, असे सांगत होते. मात्र, अचानक आठ सप्टेंबरला तुकडा तांदूळ निर्यातबंदी आणि बिगर बासमती तांदळाच्या निर्यातीवर वीस टक्के निर्यात कर लागू करण्यात आला. या निर्णयाची अंमलबजावणी नऊ सप्टेंबरपासून करण्यात आली.

### थोडी माहिती...

खरिपातील पेरणीची पूर्ण आकडेवारी, उत्पादनाचा अंतिम अंदाज हाती आल्यानंतरच नोव्हेंबर महिन्यात होणाऱ्या बोर्ड ऑफ ट्रेडच्या बैठकीत याबाबत निर्णय घेतला जाऊ शकतो, अशी ग्वाही गोयल यांनी दिली आहे.

**- विनेष मेहता, सदस्य, बोर्ड ऑफ ट्रेड**





### तातडीने तोडगा नाही...

देशातील जनतेला वर्षभर पुरेल इतका तांदळाचा साठा देशात आहे, याबाबत केंद्र सरकारची खात्री पटल्यानंतरच याविषयी निर्णय होऊ शकतो. त्यामुळे याबाबत तातडीने कोणताही निर्णय शक्य नाही.

# अतिवृष्टीच्या नुकसानीचा १०० कोटींचा प्रस्ताव शासनाकडे सादर : जिल्हाधिकारी

**पहिल्या टप्पातील ४० कोटींचे वाटप; दोन दिवसात खात्या पैसे होणार जमा**



**सोलापूर** : नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमध्ये उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट आणि बार्शी या चार तालुक्यातील बाधित २८ हजार ६६ शेतकऱ्यायांसाठी पहिल्या टप्प्यातील ४० कोटी ५३ लाख ४९ हजारांचा निधी आला होता. तो निधी खाली वर्ग करण्यात आला आहे. दोन दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यावर नुकसान भरपाईचे पैसे जाम होणार आहे.

तर पुन्हा झालेल्या पावसामुळे ६२ हजार हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. यामध्ये फळबागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ज्य मंडलात एका दिवसात ६५ मि.मी. पाऊस पडल्याची नोंद झाली आहे. अशा अंदाजे १०० कोटींचा नुकसानीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला असल्याची माहिती जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिली.

### आर्थिक मुदतीत वाढ

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पूर्वी जिरायत पिकांसाठी हेक्टरी ६ हजार ८०० आर्थिक मदत होती. आता ती १३ हजार ६०० रुपये करण्यात आली आहे. बागायती पिकांसाठी एका हेक्टरसाठी १३ हजार ५०० रुपयांची होती. ती मर्यादा वाढवून आता २७ हजार रुपये करण्यात आली आहे. बहुवार्षिक पिकांसाठी पूर्वी १८ हजार रुपये हेक्टरी मिळत होते. त्यामध्ये आता वाढ करून ३६ हजार रुपये करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील चार तालुक्यातील काही मंडलातील ६५ मि.मी पाऊस झाला आहे. एकाच मंडलात दोन वेळा ६५ मि.मी पाऊसाची नोंद झाली आहे .उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट आणि बार्शी तालुक्यातील काही मंडलाचा समावेश आहे. अतिवृष्टमुळे नुकसान झालेल्या २८ हजार ६६ शेतकऱ्यायांसाठी पहिल्या टप्प्यातील ४० कोटी ५३ लाख ४९ प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. तो निधी जिल्हाप्रशासनास प्राप्त झाला आहे. तो चार तालुक्यामध्ये वर्ग करण्यात आला आहे. दोन दिवसात खात्यावर पैसे जमा होतील असे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी सांगितले. २४ तासात ज्या मंडलामध्ये ६५ मि.मी पाऊस झाला आहे. त्यामुळे झालेल्या पिकांचे पंचनामे करण्याचे शासन आदेश आहे. त्यामुळे सरसगट नुकसान भरपाई दिली जात नसल्याचा खुलास जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केला.

सध्या अतिवृष्टीची दोन हेक्टरपर्यंतच मदत देण्यात यावी, अशी सूचना देण्यात आल्याने शासनाने घोषणा तीन हेक्टरपर्यंत केली असली तरी पहिल्या टप्प्यातील प्राप्त निधी पाहता मदत मात्र दोन हेक्टरपर्यंतच वाटप केले आहे. पंचनामे झालेल्या भागांतील शेतकऱ्यांच्या याद्या मागवून तयार करून जवळपास १०० कोटींचा नुकसान भरपाईचा प्रस्ताव शासनाकडे सदर केला आहे लवकर निधी प्राप्त झाल्यानंतर नुकसान झोलेल्या शेतकाऱ्यांच्या खात्यावर पैसे जाम केले जाणार आहेत.

# महापालिका आजोऱ्यातून वाळू-खडी विलगीकरण प्रकल्प सुरू करणार

## अय्यर एन्व्हायरमेंट रिसर्च मॅनेजमेंट कंपनीला दिला मक्ता



**सुराज्य/सोलापूर**

**शहरात विविध ठिकाणी टाकण्यात आलेला आजोरा संकलित करून वाळू व खडी विलगीकरण प्रकल्प महापालिकेच्या वतीने बीओटी तत्त्वावर तुळजापूर रोडवरील कचरा डेपो येथे उभारण्यात येत आहे. त्याचा मक्ता अय्यर एन्व्हायरमेंट रिसर्च मॅनेजमेंट कंपनीला देण्यात येणार आहे. एकूण सुमारे १३ कोटीचा हा प्रकल्प आहे. शहरात स्वच्छता राखण्यासाठी या प्रकल्पाची मोठी मदत होणार आहे.**

शहरात अनेक ठिकाणी बांधकाम करत असताना पाडकामातील अजोरा अनेकजण विविध ठिकाणी आणि रस्त्यावर टाकतात. त्यामुळे अस्वच्छता निर्माण होते. वाहतुकीस अडथळाही निर्माण होतो. हे टाळण्यासाठी सोलापूर महापालिकेच्या माध्यमातून तुळजापूर रोडवरील कचरा डेपो येथे संकलित केलेल्या आजाऱ्यातून वाळू - खडी विलगीकरण प्रकल्प उभारण्यात येत आहे. कचरा डेपो येथे एकूण ५ एकर जागेवर हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. त्यापैकी दीड एकर जागेवर मूळ प्रकल्प राहणार असून उर्वरित जागेवर अजोरा साठविण्यात येणार आहे. शहरात यापुढे आता नवे बांधकाम करण्यापूर्वी पाडकामसाठी महापालिकेकडे मागणी करतानाच फी आकारून हा आजोरा मक्तेदाराच्या माध्यमातून कचरा डेपो येथे हलविण्यात येणार आहे. एखाद्या मिळकतदाराने परस्पर जर रस्त्यावर किंवा इतरत्र पाडकामाचा आजोरा टाकल्यास त्यांच्यावर दुप्पट दंड आकारला जाणार आहे. यामुळे परस्पर कुठेही आजोरा टाकून अस्वच्छता करण्याच्या प्रकारावर पायबंध बसणार आहे. शहरातून संकलित केलेला आजोरा कचरा डेपो येथील या प्रकल्पाच्या ठिकाणी एकत्र करण्यात येईल. त्या ठिकाणी त्यावर प्रक्रिया करून या आजोऱ्यातील खडी व वाळू वेगळी करण्यात येईल. ही विलगीकृत वाळू व खडी त्यानंतर विक्री करण्यात येणार आहे. बांधकाम परवानगी घेतानाच पाडकामाची माहिती घेण्यात येईल. त्यानंतर पाडकामानंतर पडलेला आजरा मक्तेदाराच्या मार्फत कचरा डेपो येथे हलविण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक ती फी संबंधित बांधकाम धारकाकडून आकारण्यात येणार आहे.

### ■ प्रकल्पासाठी शासनाकडून निधी मिळणार

एकूण सुमारे १३ कोटीचा हा प्रकल्प आहे. त्यापैकी साधनसामग्रीसाठी शासनाकडून ७.५ कोटीचा निधी मिळणार आहे. मुंबई, पुणे, ठाणे, पिंपरी-चिंचवड यासह इतर महानगरपालिकांच्या माध्यमातूनही असा प्रकल्प सुरू आहे. आता सोलापुरात हा प्रकल्प सुरू करण्यात येत आहे.

### ■ लवकरच वर्क ऑर्डर देणार : आयुक्त

या प्रकल्पाची निविदा काढण्यात आली आहे. या कामाचा मुक्ता अय्यर एन्व्हायरमेंट रिसर्च मॅनेजमेंट कंपनीला निश्चित करण्यात आला आहे. लवकरच वर्क ऑर्डर देण्यात येणार आहे. आजोरा वाहतुकीसाठी संबंधित मक्तेदारास प्रति टन १४९ रुपये तर प्रक्रिये करिता (प्रोसेसिंग आणि डिस्पोजल) प्रति टन २२१ रुपये अदा करण्यात येणार आहेत असे दोन्ही मिळून एकूण प्रति टन ३७० रुपये महापालिका मक्तेदारास अदा करण्यात येणार असल्याचे आयुक्त पी.शिवशंकर यांनी सांगितले.



## पाच मोटारसायकलींसह चोरट्याला अटक

**सोलापूर** : शहर गुन्हे शाखेकडील पथकाने एका मोटारसायकल चोरी करणाऱ्या चोरट्याला ताब्यात घेण्यात आल्यानंतर त्याच्याकडून पाच मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या आहे. शहर गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दादासाहेब मोरे व त्यांच्या पथकातील पोलीस अंमलदार हे सोलापूर शहर परिसरात मोटारसायकल चोरींच्या गुन्ह्याचा शोध घेत होते. दि.२१ सप्टेंबर रोजी स.पो.नि. दादासाहेब मोरे व त्यांचे पथक शहरात पेट्रोलिंग करत असताना पो.कॉ. इम्रान जमादार व राजकुमार पवार यांना एक इसम पोटफाळी चौक परिसरात नंबर प्लेट नसलेली मोटरसायकल विक्री घेऊन येणार आहे असे समजले.त्यावेळी त्यांनी सापळा लावून हणमंतु कुर्मय्या नागापागोलू (वय-४०,रा.उत्तर सदर बाजार, सरस्वती चौक) याला रात्री पावणेदहा वाजता ताब्यात घेऊन अटक केली. त्याच्याकडून ८५ हजार रुपये किमतीच्या पाच मोटारसायकली हस्तगत केल्या. त्याने या मोटारसायकली बनावट चावीचा वापर करून पार्किंग केलेल्या ठिकाणाहून मोटरसायकली चोरल्या आहेत. ही कामगिरी दादासाहेब मोरे,पोलीस अंमलदार संदीप जावळे, इम्रान जमादार, विनोद रजपूत, राजकुमार पवार, वसीम शेख यांनी केली.




## जि.प. आवारातील खोकेधारकांचे पुनर्वसन करण्याची मागणी

**सोलापूर** : सोलापूर शहरातील जिल्हा परिषदेच्या आवारात खोकेधारक गेली २० ते २५ वर्ष त्याठिकाणी काम करत आपल्या कुंटूबाचा उदारनिर्वाह करत आहेत. साधारण १०० ते १५० खोकेधारक त्याठिकाणी आपला व्यवसाय करून उदारनिर्वाह करतात. प्रत्येक दुकानात साधारणतहा ३ते४ लोक काम करत असतात. यांच्यावर कारवाई नकरता खोकधारकाचे पुर्नवसक्न करा अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख मनिष काळजे यांच्या नेतृत्वाखाली खोकेधारक शिष्टमंडळानी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली पालिका प्रशासनाकडून कारवाई केली जात आहे. याकारवाईमुळे या खोकेधारकांचा संसार रस्त्यांवर येईल त्यामुळे कारवाई नकरता या खोकेधारकांचे पुर्नवसन करा अशी मागणी यावेळी करण्यात आली. कारवाई करण्यापूर्वी एक समन्वय बैठक घेण्यात यावी व त्याच्या पुर्नवसाबाबत विचार करावा, मुख्यमंत्री. एकनाथ शिंदे व आरोग्य मंत्री. तानाजीराव सावंत यांच्या सोबत देखील या पुर्नवसाबाबतीत चर्चा करून त्यांचे पुर्नवसन कसे करता येईल याबाबत पाठपुरावा करावा, अशी मागणी केली आहे.

## परीक्षा देण्यासाठी गेलेल्या महिलेचे अपहरण

**सोलापूर** : परीक्षा देण्यासाठी गेलेल्या महिलेचे अपहरण केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.२२ सप्टेंबर रोजी सकाळी पावणे नऊ ते सव्वानऊच्या दरम्यान गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक कॉलेज बी १ परीक्षा हॉल येथे घडली. याप्रकरणी ऋत्विक दशरथ राठोड (वय-२३,रा. माशाळ नगर, ज्ञान प्रबोधिनी शाळेजवळ, विजापूर रोड) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. विलास शेट्टीबा चौगुले,मनीषा विलास चौगुले (दोघे.रा.सोलापूर) यांच्यासह एका अनोळखी महिलेविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. २२ रोजी गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक कॉलेज बी १ या परीक्षा हॉल मध्ये ऋत्विक व त्याची पत्नी आले . ऋत्विक पत्नीला पेपर देण्याकरिता हॉलमध्ये सोडून बाहेर गेले.त्यादरम्यान ऋत्विक यांच्या पत्नीचे आई-वडील त्या ठिकाणी येऊन दोघांचा विवाह मान्य नसल्याने ऋत्विकच्या पत्नीला जबरदस्तीने घेऊन जाऊन तिचे अपहरण केले. असे फिर्यादीत नमूद आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक शेख हे करीत आहेत.

## झेडपीच्या गेटवरील फलकाने वेधले लक्ष

**पंढरपूर** : जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वारावर लटकवलेल्या एका फलकांने येथील जनतेचे लक्ष वेधून घेतलं आहे. जिल्हा परिषदेच्या विद्यमान सदस्यांची मार्चमध्ये मुदत संपल्याने प्रशासकराज सुरू आहे. जिल्हा परिषदेत विविध कामांसाठी लोक दररोज येत असतात. जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकलेले मोर्चे ही जिल्हा परिषदेच्या गेटवरच येतात. या मोर्चादरम्यान आलेल्या कार्यकर्त्यांने आपल्या हातातील फलक झेडपीच्या गेटवर लटकावला आहे. आमदार' खासदार तुपाशी तर जनता उपाशी' असा या फलकावर मजकूर आहे. कुणी मंत्र झेडपीत मनिमित आलेल्या नागरिकांनीच हा फलक लावला आहे, तर कुणी म्हणत झेडपीच्या कारभारावर लक्ष वेधण्यासाठी हा फलक लावला आहे. दोनच हा फलक सध्या चर्चेचा विषय झाला आहे, तरीही हा फलक येथून कुणी हटविला नाही, हे विशेष.

# सपाटेंच्या अटकेसाठी पोलीस मागावर

**सुराज्य/सोलापूर**

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी महापौर मनोहर सपाटे यांच्यावर गुरुवारी रात्री उशिरापर्यंत अत्याचाराबाबत गुन्हा दाखल होताच पोलिसांचे पथक त्यांच्या अटकेसाठी मागावर आहेत.

शिक्षण संस्थेतल्या शिक्षिकेसोबत जवळीक साधत तिला लग्नाचे आमिष दाखवत तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष सपाटे यांच्यावर गुरुवारी रात्री उशिरा फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. गुन्हा दाखल झाल्याची कुणकुण लागतात. सपाटे यांना ताब्यात घेऊन अटक करण्यासाठी पोलिसांचे पथक त्यांच्या मागावर आहे. पीडित महिला ही शाळेत शिक्षिका होती. त्यावेळी तिच्यासोबत लग्नाचे आमिष दाखवून सपाटे यांनी तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवले आणि अत्याचार केला. विनयभंगाची तक्रार देण्यासाठी पोलीस ठाणे गाठल्यानंतर तिच्यावर दबाव आणून तक्रार मागे घेण्यास भाग पाडले होते.तिची इच्छा नसतानाही तिचा राजीनामा घेतला.

निवृत्तीचे पैसे देण्यासाठी व जमिनीच्या व्यवहारातील असे एकूण दहा लाख रुपये जबरदस्तीने घेतले.अशा आशयाची तक्रार पीडित महिलेनी दिली होती.पोलीस उपायुक्त डॉक्टर वैशाली कडूकर तसेच फौजदार चावडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील यांनी या तक्रारची गंभीर दखल घेतली होती.दरम्यान हे



वृत्त शहरभर पसल्याने मराठा समाजातील विविध संघटना एकवटल्या व त्यांनी पोलीस आयुक्तांकडे सपाटे यांच्या अटके संदर्भात मागणी केल्याने अखेर सपाटे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

### तपास सुरू आहे

गुन्हा दाखल झाल्याने आता फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे पथक त्यांच्या मागावर आहे. सपाटे यांना शोधण्यासाठी आम्ही घरी देखील गेलो व सर्वत्र त्यांचा शोध घेतला परंतु ते कुठेही मिळून येत नाहीत.सपाटेंचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. तसेच या घटनेतील सीसीटीव्ही फुटेज, साक्षीदारांचे जबाब, पंचनामे, खंडणी मागितल्याचे मोबाईल रेकॉर्डिंग, अत्याचार ग्रस्त ठिकाणाची पाहणी, करण्यात गुंतले आहेत, असे फौजदार चावडीचे वरिष्ठ पो. नि. उदयसिंह पाटील यांनी सांगितले.



## सेवा पंधरवड्यात हजार जातवैधता प्रमाणपत्रांचे वाटप

**सोलापूर** : 'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा'निमित्त येथील जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने राबविलेल्या विशेष अभियानात एक हजारहून अधिक जात वैधता प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.शुक्रवारी समितीच्या कार्यालयात आयोजित एका कार्यक्रमात या जात वैधता प्रमाणपत्रांचे वाटप केले असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर सुळ यांनी दिली.

या शिबिरांमध्ये जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सचिव सचिन कवले यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात जात पडताळणी समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर सुळ, सचिव सचिन कवले, सदस्या छायाताई गाडेकर यांच्या उपस्थितीत जात वैधता प्रमाणपत्रांचे संबंधितांना वाटप करण्यात आले.

समितीकडे प्राप्त झालेल्या अर्जांची तात्काळ छाननी करून त्या त्या दिवशी वैधता प्रमाणपत्रे संबंधितांना देण्याचा समितीचा प्रयत्न आहे. त्यासाठी समिती कार्यालयातील सर्व कर्मचारी परिश्रम घेत आहेत, अशी माहिती समितीच्या सदस्या छायाताई गाडेकर यांनी यावेळी दिली. यावेळी व्यवस्थापक श्रीकृष्ण मोटे, ॲड. श्रीकांत शिवळकर उपस्थित होते.

# बँक ऑफ महाराष्ट्रला राजभाषेचा पुरस्कार प्रदान

**सुराज्य/सोलापूर**

सुरत, गुजरात येथे झालेल्या एका समारंभात भारत सरकारच्या गृह मंत्रालयातर्फे देण्यात येणारा राजभाषा वापरासाठीचा प्रतिष्ठित व सर्वोच्च असा कीर्ती पुरस्कार हा देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रला प्रदान करण्यात आला. राजभाषेचे प्रभावी कार्यान्वयन व सर्वोत्तम अंतर्गत मासिक पत्रिका या दोन वेगवेगळ्या वर्गवारीमध्ये बँकेला हा सर्वोच्च प्रतिष्ठेचा कीर्ती पुरस्कार बहाल करण्यात आला. केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह हे या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाला सुरवात होण्यापूर्वी बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी ए.एस. राजीवयांनी केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह तसेच केंद्रीय गृह राज्यमंत्री निशीथ प्रामाणिक व अजय कुमार मिश्रा यांचा सत्कार केला. गुजरात राज्याचे मुख्यमंत्री भूपेंद्रभाई पटेल व अन्य मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते. बँक ऑफ महाराष्ट्रच्या मनुष्यबळ व्यवस्थापन व राजभाषा



विभागाचे सरव्यवस्थापक के.राजेश कुमार यांनी राजभाषेचे प्रभावी कार्यान्वयन या वर्गवारीमध्ये तर बँक ऑफ महाराष्ट्रच्या राजभाषा विभागाचे उपसरव्यवस्थापक डॉ.राजेंद्र श्रीवास्तव यांनी सर्वोत्तम अंतर्गत मासिक पत्रिका या वर्गवारीमध्ये राज्यसभेचे माननीय उपसभापती हरिवंश नारायण सिंह यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारला.

शासकीय कार्यालये, उपक्रम व सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे देशभरातील उच्चाधिकारी देखील या कार्यक्रमास उपस्थित होते. राजभाषेचे प्रभावी कार्यान्वयन व सर्वोत्तम अंतर्गत मासिक पत्रिका या दोन वेगवेगळ्या वर्गवारीमध्ये बँकेला हा सर्वोच्च प्रतिष्ठेचा कीर्ती पुरस्कार प्रथमच प्राप्त झाला आहे.

# दिलीपराव माने यांचा पुढाकार; गुंजेगावमधील पिकांचे पंचनामे सुरु

**सोलापूर** : अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाल्यामुळे माजी आमदार दिलीपराव माने यांनी उत्तर व दक्षिण सोलापूर तालुक्यातील नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करुन भरपाई देण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन केली होती.त्यानुसार पंचनामे देखील सुरु झाले.मात्र गुंजेगाव येथे पंचानाम्यास कोणीच येईना याची दखल घेत वरीष्ठास सांगून पंचनामे सुरु करण्यात आले.



गुंजेगाव येथील गाव कमगार तलाठी हे सध्या प्रभारी म्हणून कार्यरत आहेत त्यांच्याकडे तीन-चार गावाचा कारभार आहे. कृषी अधिकारी हे देखील प्रशिक्षणला गेल्यामुळे पंचनामे होणार का अशी भिती शेतकऱ्यांत होती. माजी आमदार दिलीपराव माने यांना शेतकऱ्यांनी ही अडचण सांगीतल्यांनतर त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलून गुंजेगाव येथील पंचनाम्यास अधिकारी उपलब्ध करून दिले आणि पिक पंचनाम्यास सुरुवात आज झाली. यावेळी शेतकरी किशोर कुलकर्णी, उत्तम जाधव गावकामगार तलाठी सुरेश कोळी कृषी अधिकारी फडतरे पोलीस पाटील श्रीराम पाटील विकास साळुंखे ज्ञानेश्वर साळुंखे दत्ता पवार अमीर शेख उपस्थित होते.यावेळी विकास पाटील यांनी गुंजेगाव येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आपल्या खरीप पीक नुकसानीचे पंचनामे करून घ्यावेत असे आवाहन केले आहे.

# शहरातील फेरीवाले, पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण झाले पूर्ण

## ▶ महानगरपालिकेच्या समूह संघटकांकडून काम सुरू

**सुराज्य/सोलापूर**

महापालिकेच्या राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत सोलापूर शहरातील सर्व फेरीवाले, पथविक्रेत्यांचे विविध निकषांच्या आधारे सर्वेक्षण सुरु आहे. आतापर्यंत शहरातील ६ हजार ११३ पथ विक्रेत्यांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे.

आता उर्वरित सर्वेक्षण येत्या ३० सप्टेंबर पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. शासन नियमानुसार शहरात १ लाख लोकसंख्येच्यामागे एक हजार याप्रमाणे शहरातील १० लाख लोकसंख्येच्या तुलनेत सुमारे १० हजार फेरीवाले व पथविक्रेते असण्याची शक्यता आहे. यापूर्वी घेण्यात आलेल्या सर्वेक्षणा दरम्यान सर्वेक्षण वेबसाईट बंद असल्याने या कामाला ब्रेक लागला होता.यापूर्वी ४ हजार ७५२ पथ विक्रेत्यांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले होते. दरम्यान, आता हे सर्वेक्षण पुन्हा एकदा महापालिकेच्या दीनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत युसीडी विभागाचे समूह संघटक यांच्या माध्यमातून उर्वरित सर्वेक्षण पूर्ण करण्याचे काम सुरू आहे. योजनेच्या अंमलबजावणी करण्यासाठी पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण करणे महत्वाचे आहे. महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांच्या आदेशानुसार उपायुक्त मच्छिंद्र घोलप , सहायक आयुक्त श्रीराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हे सर्वेक्षण करण्यात येत आहे. शहरात युसिडी विभागातील १५ समूह संघटक शहरातील विविध भागात जाऊन हे सर्वेक्षण करीत आहेत.



### पथविक्रेत्यांना सोयीसुविधा मिळणार

सोलापूर शहरातील पथविक्रेत्यांना त्यांची शैक्षणिक पात्रता, मर्यादित कौशल्य व आर्थिक पत यामुळे व्यवसायाच्या संधी कमी उपलब्ध असतात. यामुळे असंघटित आणि स्वंयरोजगार करणाऱ्या पथविक्रेत्यांना व्यवसायाच्या व्यापाक संधी उपलब्ध करून देणे, त्यांना कार्यकुशल बनविणे त्यांना पत मिळविण्यास समर्थ बनविणे तसेच त्यांची व त्यांच्या कुटुंबांची सामाजिक सुरक्षितता, सामाजिक कल्याण व शासकीय योजनांशी सांगड घालणे व त्यांचे जीवनमान उंचावणे, यासाठी सर्वेक्षण करून लाभ देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.

### पथविक्रेत्यांनी कागदपत्रे जमा करावीत : मुलाणी

पथविक्रेता धोरण कार्य पूर्ण करण्यात येणार आहे. ज्या फेरीवाले, पथविक्रेत्यांना निकषाप्रमाणे कागदपत्रे महापालिकेत शहर अभियान कक्षात दाखल करणे शक्य आहे त्यांनी जमा करून पोच पावती घ्यावी. शहरातील सर्व पथविक्रेत्यांनी या सर्वेक्षणात सहभागी होऊन महापालिकेच्या समूह संघटनकडून आपले सर्वेक्षण ३० सप्टेंबर २०२२ पूर्वी करून घ्यावे, असे आवाहन महापालिका शहर अभियान व्यवस्थापक समीर मुलाणी यांनी केले आहे.